डिसेंबर २०२५,
जानेवारी २०२६
वीरनिर्वाणसंवत् २५५१
वर्ष ७६वे, पुष्प ५वे–६वे
मार्गशीर्ष–पौष–माघ शके १९४७
UGC-CARE Listed
Research Journal
(Since-Jun2019)
www.sanmatimasik.com

सन्मति प्रकाशन
स्थापना :१५ ऑगस्ट १९५०

ISSN- 2395-5503
RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07

बाहुबली विद्यापीठ व ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र

# सन्मति

मूल्य – २५ रु.



श्रीमती विनयाताई शहा
मनोगत व्यक्त करताना





श्री. सुजयभाई शहा
मनोगत व्यक्त करताना





श्रेयांसकुमार उदयबाबू शहा भोजनगृह या नूतन भोजनगृहाच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित आचार्यश्रींचा संघ व शहा परिवार
(वार्ता पृष्ठ क्र. ०६वर)

# राष्ट्रीय विद्वत् संगोष्ठी, शोभायात्रा व ग्रंथ प्रकाशनाची क्षणचित्रे.....



सत्प्रेरणा–शुभाशीर्वाद



प.पू. गुरुदेव १०८ श्री
समंतभद्र महाराज

उन्नतं मानसं यस्य, भाग्यं तस्य समुन्नतम् ।

# सन्मति

पो. बाहुबली, जि. कोल्हापूर
पिन–४१६ ११० ☎(०२३०) २५८४४२२

संस्थापक–संपादक



स्व. ब्र. माणिकचंद भीसीकर
एम्. ए., न्यायतीर्थ

## डिसेंबर २०२५–जानेवारी २०२६

❍ वर्ष: ७६ वे ❍ पुष्प ५वे–६वे

❑ वार्षिक वर्गणी :२५०/-

❑ द्वादशवर्षीय वर्गणी :२५००/-

❍ संपादक मंडळ ❍

❍ **डॉ. नेमिनाथ शास्त्री,** एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

❍ **सुश्री प्रज्ञाताई डोणगांवकर,** कारंजा, बी.एस्सी.

❍ **डॉ. लीना चवरे,** कारंजा, एम.ए., बी.एड्., पीएच्.डी.

**बँक खात्याचे विवरण –**

Bank Name-ICICI Bank, Branch- Bahubali IFSC- ICIC0006388

* Shri Bahubali Vidyapeeth - A/C No- 638801700001 (80G **करपात्र सवलतीकरिता**)

* Shri Bahubali Brahmacharyashram- A/C No- 638801700002 (सन्मतिसाठी वर्गणी, दानराशी Shri Bahubali Brahmacharyashram या खात्यावर पाठवा.) (80G **करपात्र सवलतीकरिता**)

**(सन्मती मासिकातून प्रकाशित होणारे सर्व शोधप्रबंध व लेख हे संशोधक आणि लेखकांचे व्यक्तिगत विचार आहेत. त्याची प्रामाणिकता व योग्यता याविषयी तेच सर्वस्वी जबाबदार आहेत. प्रकाशक किंवा संपादक हे केवळ संवाहक आहेत.)**

## ⊙ अनुक्रमणिका ⊙

✲ संपादकीय..राष्ट्रीय विद्वत् संगोष्ठीची अभूतपूर्व सफलता.. –डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली ०४
✲ प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला (भाग १३९) –आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी ०९
✲ योगसार चिंतन (१०) – प्रियदर्शन जैन, नागपूर १५
✲शिक्षण – जीवन उजळवणारी दीपशिखा – सौ. स्वप्नाली प्रवीण पाटील, बाहुबली १७
✲ पट्टमहादेवी–शब्दांपलिकडील अन्वयार्थ (२६) –विपुल खेडकर, नागपूर १८
✲ 'सोलहकारण भावना भाय....!'(१२) – हर्षा वेखंडे, नागपूर २३
✲ संवाद हरवलेलं कुटुंब – श्री. महावीर शिरगावे, बाहुबली २९
✲ भरत आणि भारत – श्री. प्रमोद पाटील, बाहुबली ३१
✲ पं. श्री. आलोकजी शास्त्री यांना पीएच. डी. प्राप्त ३४
✲ विशेष वार्ता ३५

Merchant Name : BAHUBALI BRAHMACHARAY ASH
UPI ID : schoolbahubali@sbi

BHIM UPI

**दशलक्षण महापर्वानिमित्त किंवा विविध पारिवारिक समारंभानिमित्त बाहुबली गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सद्दानराशी, पुरस्कार राशी, धर्मिक गतिविधीस प्रोत्साहन देण्यासाठी अथवा बाहुबली संस्थेस देणगी देण्यासाठी किंवा सन्मती मासिकाची वाढीव वर्गणी पाठवून देण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा आणि ट्रांझक्शन आयडी पाठवून द्यावे. जेणेकरून पावती करता येईल. आपल्या देणगीस आयकर सवलत मिळते. आपल्या सर्वांचे सहकार्य मिळावे, हीच सद्भावना...!!**

**संपादकीय....**

# गोम्मटसार जीवकांडवर आधारित राष्ट्रीय विद्वत् संगोष्ठीची अभूतपूर्व सफलता

**डॉ. नेमिनाथ शास्त्री, बाहुबली**

श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ ते रविवार दि. ३० नोव्हेंबर २०२५ अखेर गोम्मटसार जीवकांड या ग्रंथावर आधारित राष्ट्रीय विद्वत् संगोष्ठी संपन्न झाली. यासाठी आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज व आर्यिका १०५ शुद्धोऽहंश्री माताजी आणि अन्य संघस्थ त्यागीगण यांचे मंगल सान्निध्य लाभले. या संगोष्ठीचे मुख्य निर्देशन आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी आणि पं. श्री. विकासजी छाबडा, इंदौर यांनी केले.

सुमारे १८ विद्वानांनी तीन दिवसांमध्ये एकूण सहा सत्रामध्ये मार्गदर्शन केले. प्रत्येक विषयावर आपले सखोल चिंतन २५ मिनिटात सांगत होते. त्यानंतर दहा ते पंधरा मिनिट तत्त्वचर्चा होत असे. यातील शंका-समाधानासाठी आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी यांचे अनमोल विचार ऐकण्यास मिळाले. संपूर्ण ग्रंथावर आद्योपांत चर्चा करण्यात आली. यासाठी देशभरातून सुमारे २०० जाणकार श्रावक - श्राविका उपस्थित होते. बहुदा सर्वच उपस्थित श्रावक हे नित्य स्वाध्यायी आणि तत्त्वचिंतन करणारे होते, यात शंका नाही. अशा प्रकारे एखाद्या कठीण विषयावर सहजतेने व सरलतेने तत्त्वचर्चा घडली. त्यामुळे बाहुबली खऱ्या अर्थाने सातिशय क्षेत्र बनले. उपस्थित अनेक विद्वानांनी येथील पवित्र वातावरणाचा महिमा स्पष्ट केला. येथील अणुरेणूमध्ये असणारी पवित्रता सर्वांनी अनुभवली. या क्षेत्रावर आल्यानंतर सहजतेनेच परिणाम विशुद्ध होत असतात आणि कषाये मंद होतात. खरोखर तीर्थक्षेत्रावर पोहोचल्याने पुण्य लाभ सहजतेने घडते. पण तीव्र कषायी जीव मात्र तेथेही वादविवाद करून आपला मानव जन्म व्यर्थ घालवितात.

या क्षेत्राविषयी अनेक तपस्वी, त्यागी व ज्ञानी विद्वानांनी वेळोवेळी आपले अनेक प्रकारचे अभिप्राय व्यक्त केले आहेत. श्रवणबेळगोळा येथील जगद्गुरु स्वस्तिश्री चारुकीर्ती भट्टारक महास्वामी म्हणतात की, ज्याप्रमाणे लोक उच्च शिक्षणासाठी आपल्या मुलांना ऑक्सफर्ड किंवा केंब्रिज विद्यापीठात पाठवितात. त्याप्रमाणे जैन धर्मातील करणानुयोगाच्या उच्च शिक्षणासाठी बाहुबली गुरुकुल हे केंब्रिज विद्यापीठाप्रमाणे आहे. अशा प्रकारे हे एक पवित्र आध्यात्मिक साधना केंद्र आहे.

अन्य आचार्यश्री व त्यागी गण म्हणतात, बाहुबली गुरुकुल एक कल्पवृक्ष आहे. ही सत्संस्कारांची पाठशाळा आहे. ही मानव निर्मितीची फॅक्टरी आहे. येथे जिवंत मूर्ती घडविले जातात. धर्मासाठी पवित्र चिंतामणी रत्न आहे. या क्षेत्राकडे पाहिले असता असे वाटते की आगमानुसार दक्षिण भारतातच जैन धर्म टिकून राहणार आहे. येथे लौकिक शिक्षणासोबत नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक मूल्यशिक्षण दिले जाते. अशा प्रकारे लौकिक आणि पारमार्थिक शिक्षणाचा समन्वय अन्यत्र कोठेही मिळत नाही. येथे अनेक शतकापासून विविध प्रांतातील अनेक त्यागी लोकांनी तपश्चर्या केली आहे. त्यांच्या तपोसाधनेने बनलेले पवित्र वातावरण सर्वांना आनंद देते. त्यामुळे येथील कणाकणात वीतरागता, अहिंसा, सदाचार भरलेला आहे. येथे नास्तिकाचेही मस्तक आपोआप झुकते. मनातील विसंवाद दूर होतो. मायाचार, कुटिलता नष्ट होते. अन्य क्षेत्रावर केलेले पाप येथे आले असता निश्चितच दूर होते, पण येथेही येऊन

मायाचार, ईर्षा इत्यादी पाप कार्य केले असता निश्चितच महाभयानक कर्मबंध घडत असते. या आर्षवचनांना जाणून या क्षेत्राविषयी अनेकांच्या मनातील असलेले आकर्षण सहजतेने कळते.

गोम्मटसार जीवकाण्ड वर आधारित राष्ट्रीय विद्वत् संगोष्ठी शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहामध्ये सुरू झाली. उद्घाटनप्रसंगी 'आपले विचार, उच्चार आणि आचरण सुधारण्यासाठी हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आहे. यामध्ये जीवाच्या शुद्ध व अशुद्ध परिणामांचे वर्णन केले आहे. संसारामध्ये हा जीव कोणत्या कारणामुळे दुःखी आहे आणि त्यांना आपण कसे दूर करू शकतो याविषयीचे वर्णन वाचत असताना निश्चितच आपल्या जीवनाची प्रगती होते. आपले जीवन मंगलमय करण्यासाठी हा ग्रंथ सर्वांनी अवश्य वाचावा.' अशाप्रकारचे धार्मिक उद्बोधन आर्यिका शुद्धोऽहंश्री माताजी यांनी केले. 'सर्व बाजूंनी वार करतो तो परिवार म्हणून यापासून सावध राहून आपण आपले हित साधले पाहिजे. सर्वांशी विश्वमैत्री व बंधुत्वाची भावना असावी,' अशाप्रकारे आचार्य श्री सुयशसागरजी महाराज म्हणाले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जैनदर्शन विभागाध्यक्ष लालबहादूर शास्त्री विश्वविद्यालय दिल्लीचे डॉ. वीरसागरजी जैन व भूतपूर्व प्राकृत विभागाध्यक्ष लालबहादूर शास्त्री विश्वविद्यालय दिल्लीचे डॉ. जयकुमार उपाध्ये यांच्या हस्ते करण्यात आले. प्रथम सत्रामध्ये संपादक, सन्मती मासिक बाहुबलीचे डॉ. नेमिनाथ शास्त्री यांनी आचार्य नेमिचंद्र सिद्धांतचक्रवर्ती : व्यक्तित्व व कर्तृत्व याविषयी विवेचन केले. डॉ. राकेशजी शास्त्री यांनी गुणस्थान प्रारूपणा १ ते ७ याविषयी विवेचन केले. सौ. संगीताजी दोशी यांनी गुणस्थान प्रारूपणा ८ ते १४ या विषयाचे विवेचन केले. प्रथम सत्राचे सूत्रसंचालन मंथन गाला व रोहित सिदनाळे यांनी केले.

द्वितीय सत्रामध्ये मंगलाचरण श्रीमती श्वेता मेहता, मुंबई यांनी केले. प्रस्तावना श्री. संतोष मिणचे शास्त्री यांनी केले. ब्र. मृदुला दीदी, खंडवा यांनी जीव समास प्रारूपणा याविषयी विवेचन केले. द्वितीय विवेचन डॉ. वीरसागरजी जैन, नई दिल्ली यांनी पर्याप्ति, प्राण मार्गणा या विषयी विवेचन केले. तृतीय विवेचन पं. श्री. चेतन दोशी, नातेपुते यांनी संज्ञा व वेद मार्गणा याविषयी विवेचन केले. पं. श्री. संयम शास्त्री, जयपुर यांनी गती मार्गणा विषयी विवेचन केले.

सायंकाळी पं. श्री. प्रकाशजी छाबडा व डॉ. राकेशजी शास्त्री, नागपूर यांची प्रवचने झाली.

दुसऱ्या दिवशी शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळच्या सत्रात श्री. मंथन गाला, मुंबई यांनी काय मार्गणा, श्री. विकासजी छाबडा यांनी योग मार्गणा आणि श्री. अभिनंदन भोरे यांनी कषाय मार्गणा या विषयी मार्मिक विवेचन केले.

दुपारी ऐरावत हत्तीवरून नवीन गोम्मटसार जीवकांड- भाग २ या ग्रंथाची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या ग्रंथाच्या विमोचनप्रसंगी वैराग येथील महिला मंडाळांनी सुंदर नृत्यासह भक्तीपूर्वक जिनवाणीचे अष्टक सादर केले. त्यानंतर फलटण येथील महिला मंडाळांनी ग्रंथरचनेचा इतिहास दर्शविणारी छानशी नाटिका सादर केली. त्यातून ग्रंथाचे महत्त्व स्पष्ट झाले. उपस्थित सर्व त्यागी आणि विद्वान यांच्या शुभहस्ते ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

यानंतर पं. श्री. प्रकाशजी छाबडा आणि पं. श्री. हर्ष शास्त्री, फुटेरा यांनी लेश्या मार्गणाचे स्वरूप स्पष्ट केले. रात्रीकालीन प्रवचनामध्ये पं. श्री विकासजी छाबडा व डॉ. वीरसागरजी जैन यांनी सूक्ष्म मार्गदर्शन केले. गुणवत्तापूर्ण स्वाध्याय कसा असावा याविषयी काही मुद्दे स्पष्ट केले.

तिसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात गोम्मटसार हा ग्रंथ केवळ ज्ञानच नाही तर भक्ती आणि श्रद्धानाची वृद्धी करतो. या ग्रंथाची भाषा प्राकृत असून सर्व धार्मिक ग्रंथांसाठी हा ग्रंथ एक आदर्श उदाहरण आहे, असे डॉ. जयकुमार उपाध्ये, नवी दिल्ली यांनी आपल्या गोम्मटसारमध्ये प्राकृत

भाषा शैली, सौष्ठव या विषयावर विवेचन करताना सांगितले.

दुसऱ्या मार्गदर्शिका विदुषी सारिकाजी छाबडा इंदूर ज्ञान मार्गणा याविषयी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या, अज्ञान आत्म्याला दुःख देते व चारित्राचा घात करते. अज्ञानाचा सद्भाव असेल तर दुःखच मिळणार असद्भावामुळेच सुख मिळेल. अज्ञानाच्या आवरणामुळेच हा जीव सर्वत्र अंधकाराला सामोरे जात आहे.

दुसऱ्या सत्रात संयम मार्गणा याविषयी बोलताना पं. श्री. मंथन गाला, मुंबई यांनी संयमाचे महत्त्व सांगितले. संयमाशिवाय मोक्ष होऊ शकत नाही. आत्मनियंत्रणाची अवस्था म्हणजेच संयम होय. आपल्या आचरणामध्ये शुद्धता संयमामुळेच येते. अतीन्द्रिय अपार आनंदाला प्राप्त करायचे असेल तर संयम धारण करावे, अन्यथा असंयमामुळे घोर संसारातच भटकावे लागते.

ब्र. आभा दीदी दिल्ली यांनी भव्यत्व मार्गणा याविषयी मार्गदर्शन करताना भव्य जीवच सिद्धत्वाला प्राप्त करू शकतो. अभव्य जीव कधीही सिद्ध पर्याय प्राप्त करू शकत नाही. जो सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र्य प्राप्त करू शकतो, तो भव्य समजावा अन्य शेष अभव्यच होय असे सांगितले.

सम्यक्त्व हे मोक्षपथाचे पहिले चरण आहे. जे जीवाच्या खऱ्या श्रद्धानानेच प्राप्त होते. जर एकदा सम्यक्त्व प्राप्त झाले तर तो जीव निश्चितच मोक्ष पर्याय प्राप्त करतो, असे पं. श्री. सम्मेद गांधी, उदयपूर आणि याच विषयावर विशेष विवेचन करत असताना सौ. शोभा दोशी, फलटण यांनी सांगितले.

शेवटच्या वक्त्या सौ. धनश्री मेहता, सोलापूर यांनी संज्ञी आणि आहार मार्गणा याविषयी बोलताना ज्या जीवांमध्ये शिक्षण, उपदेश, क्रिया किंवा संवाद साधण्याची, ग्रहण करण्याची क्षमता असते तो संज्ञी समजावा आणि तोच जीव खऱ्या सुखाची प्राप्ती करू शकतो, असे सांगितले.

शेवटी परमपूज्य १०५ शुद्धोऽहंश्री माताजी यांनी मार्गणा म्हणजे शोध घेणे. जीवाचा मुख्य स्वभाव सत्यतत्त्वाचा शोध घेणेच आहे. आपल्या स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेण्यासाठी या जीवकांडातील मार्गणांचा स्वाध्याय करणे गरजेचे आहे, असे सांगितले.

शेवटी या विद्वत्संगोष्ठीची सांगता आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज व संपूर्ण मुनी आर्यिका संघ यांच्या मंगल सान्निध्यात झाला. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी, विविध प्रांतातून आलेले सर्व विद्वान, देशभरातून आलेले सर्व श्रावक, श्राविका, गुरुकुल विद्यार्थी यांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात संपन्न झाला. समापनाचे सूत्रसंचालन डॉ. नेमिनाथ बाळीकाई यांनी केले.

*****

## बाहुबली येथे श्रेयांसकुमार उदयबाबू शहा या नूतन भोजनगृहाचे उद्घाटन

शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वा. आचार्यश्री सुयशसागरजी महाराज यांच्या ससंघ मंगल सन्निध्यात श्रीमती विनया उदयबाबू शहा व श्री. सुजय उदयबाबू शहा, पुणे यांच्या शुभ हस्ते या भोजनगृहाचे उद्घाटन संपन्न झाले. यास श्री. प्रकाशराव आवाडे अण्णा हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यावेळी 'धर्म ही मोठी बँक आहे, संपत्ती दान केली तर ती आपल्याबरोबर जात असते. धर्मरूपी बँकांमध्ये अनंतपटीने त्याचे फळ मिळत असते. संसार सुख पाहिजे असेल तर धर्माचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. जे आपण दान देतो ते आपल्याला परत मिळतच असते, अशा प्रकारचे धार्मिक उद्बोधन आर्यिकारत्न शुद्धोऽहंश्री माताजी यांनी केले.

आचार्य सुयशसागरजी महाराज यांनी बाहुबली गुरुकुलामधून चांगले विद्यार्थी शिकून बाहेर पडले पाहिजेत. त्याबरोबर नैतिक शिक्षणाबरोबर धार्मिक शिक्षणसुद्धा विद्यार्थ्यांना द्यावे. तसेच भविष्यामध्ये विद्यार्थ्यांच्यासाठी एक चांगले वसतिगृह बांधावे, असे सांगितले.

स्वागत व प्रास्ताविक संचालक श्री.

गोमटेश बेडगे यांनी केले. बोलताना ते म्हटले की इतिहासातील अलौकिक सोहळा संपन्न होत आहे. भावना, श्रद्धा, अर्पण इत्यादी गोष्टी आपल्याला यामधून दिसून येतात. अतिथी परिचय सन्मति विद्यालय तारदाळचे माजी मुख्याध्यापक श्री. एस. एस. पाटील सर यांनी करून दिला. विनयाताई यांना दिले जाणारे सन्मानपत्राचे वाचन त्यांनी केले.

समंतभद्र दैनंदिनी-२०२६ याचे विमोचन प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

नूतन भोजनगृहासाठी शाह परिवाराने १ कोटी ५० लाख बृहद्दानराशी दिलेली आहे. तसेच भोजनगृहासाठी बृहद्दानराशी दिलेल्या श्रावकांचाही यथोचित सन्मान केला.

अतिथी मनोगतामध्ये सुजयभाई उदयबाबू शहा यांनी या बांधकामासाठी ज्यांचे योगदान लाभले त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

श्रीमती विनयाताई उदयबाबू शहा यांनी संस्थेबद्दल व नूतन भोजनगृहाबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त केली. त्याचबरोबर ही संस्था धर्म संस्काराचे केंद्र बनावे, यामधून अमूल्य संस्कार विद्यार्थ्यांनी घेऊन बाहेर पडावे त्याचे हे प्रतीक आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाशराव आवाडे यांनी शहा कुटुंबियांनी दिलेले योगदान संस्था कधीही विसरणार नाही. सर्वच क्षेत्रांमध्ये त्यांचे योगदान अतिशय मोठे आहे. त्याबद्दल त्यांनी शहा परिवाराची कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमासाठी धनराज बाकलीवाल, महामंत्री डी. सी. पाटील, कोषाध्यक्ष बाबासाहेब पाटील इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते. मेरी भावनेने या कार्यक्रमाची सांगता झाली.

* बाहुबली गुरुकुलातील मुलांच्यासाठी नूतन भोजनगृह बांधण्यात आले. त्याचे नामकरण **श्रेयांसकुमार उदयबाबू शहा भोजनगृह** असे करण्यात आले. यासाठी **पुढील दातारांनी दानराशी देऊन सहयोग केले आहे...**

* १ कोटी ५० लाख -श्रीमती विनया उदयबाबू शहा, पुणे

* ५२ लाख - श्री. रतनलाल कुवरलाल पाटणी फाऊंडेशन -हस्ते आर. के. मार्बल, किशनगड

* ५,११,१११/- पिरगोंडा महादेवगोंडा पाटील यांच्या स्मरणार्थ श्रीमती ताराबाई पिरगोंडा पाटील, सांगली

* ५,००,०००/- डॉ. अरिंजय व अनिल धन्यकुमार दोशी, कुर्डूवाडी

* ५,००,०००/- श्रीमद राजचंद्र आध्यात्मिक साधना केंद्र, कोबा -हस्ते श्री. कुमारभाई भिमानी, मुंबई

* ५,००,०००/- स्व. श्री. प्राणलाल भाईचंद देसाई व देसाई परिवार, मुंबई

* ५,००,०००/- स्व. डॉ. शांतिनाथ दादा भोमाज यांच्या स्मरणार्थ डॉ. शरद शांतिनाथ भोमाज, मिरज

* ५,००,०००/- श्री. पंडित दत्तात्रय जोशी, जयसिंगपूर

* ५,००,०००/- स्व. श्रीमती सुलभा भालचंद्र शहा, अकलूज

* ५,००,०००/- श्री. राजेंद्रकुमार, रोहनकुमार कटारिया व परिवार, अहमदाबाद

* ५,००,०००/- अजित चतुर्भुज छाबडा व परिवार, जालना

* १,२५,०००/- शेठ वालचंद हिराचंद लोक कल्याण ट्रस्ट, मुंबई हस्ते -श्री. अरविंद रावजी दोशी, मुंबई

* १,११,१११/- श्री. बी. टी. बेडगे यांच्या स्मरणार्थ श्री. गोमटेश बेडगे, बाहुबली

* १,११,१११/- सौ. राजमती व श्री. भूपाल अण्णा पाटील यांच्या प्रेरणेने श्री. भरतकुमार भूपाल पाटील (नांद्रे), बाहुबली

* १,११,१११/- श्री. शीतलनाथ व कोमलनाथ क्रांतीनाथ पाटील, जनता मेडिकल, मिरज

* १,११,१११/- गुरुकुलमाता गजाबेन यांच्या स्मरणार्थ ब्र. सुजाताई रोटे, बाहुबली

* १,११,१११/- श्री. व सौ. पद्मावती आप्पासो

पाटील, सांगली
✻ १,११,१११/- स्व. श्री. नानासाहेब आप्पासाहेब नांद्रेकर यांच्या स्मरणार्थ डॉ. दीपक नानासाहेब नांद्रेकर, कोल्हापूर
✻ १,११,१११/- स्व. रवींद्र रतनलाल दोशी यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुनंदा रतनलाल दोशी, डोंबिवली
✻ १,११,१११/- श्रीमती भारती आप्पासो चोपडे, सांगली
✻ १,११,१११/- स्व. श्री. भूपाल समाजे व स्व. श्रीमती शकुंतला समाजे यांच्या स्मरणार्थ श्री. किरण व श्री. चंद्रशेखर समाजे व समाजे परिवार, बाहुबली
✻ १,११,१११/- मातोश्री प्रभावती पोपटलालजी शहा -हस्ते श्री. मिलिंद्र शहा, मुंबई
✻ १,११,१११/- स्व. नेमिनाथ दादा भोमाज यांच्या स्मरणार्थ श्रीमती राजमती नेमिनाथ भोमाज, शिरगुप्पी
✻ १,११,१११/- श्रीमती अरुणादेवी तात्यासो पाटील, जयसिंगपूर
✻ १,११,१११/- सौ. मीनल अरविंद जैन, कोल्हापूर
✻ १,११,१११/- स्व. डॉ. सुरेश आलगोंडा पाटील, सोना क्लिनिक, सांगली
✻ १,११,०००/- श्री. धनराज नथमलजी बाकलीवाल, इचलकरंजी
✻ १,१०,०००/- कुमारी स्वस्ति सोहम् मेहता, तुळजापूर
✻ १,१०,०००/- सौ. राजश्री शांतिनाथ कांते, सांगली
✻ १,००,०००/- श्री. आमोद रतनचंद मेहता, नाशिक
✻ १,००,०००/- श्रीमती जयाबेन विशाजीभाई मारू, मुंबई
✻ १,००,०००/- सौ. दिपाली व श्री. वृषभनाथ गुंडू मलिकवाडे, कुरुंदवाड
✻ १,००,०००/- श्री. विमलकुमार प्रेमचंद बडजात्या, मदनगंज, किशनगड
✻ १,००,०००/- श्री. अप्पासाहेब कल्लाप्पा इसराणा, जयसिंगपूर
✻ १,००,०००/- स्वर्गीय डॉ. जम्बुरावजी गुंडा पाटील, कुंभोज -हस्ते बिपिनचंद्र बाबुराव जिरगे
✻ १,००,०००/- स्व. आक्काताई दादू देसाई, हरोली यांचे स्मरणार्थ श्री. जम्बूकुमार दादा देसाई, कसबा सांगाव
✻ १,००,०००/- श्री. व सौ. सीमा सारंग शहा, पंढरपूर
✻ १,००,०००/- श्री. प्रकाश आप्पासाहेब देसाई, रूकडी
✻ ५१,०००/- स्व. दादासाहेब शुबराव खंजिरे यांचे स्मरणार्थ श्रीमती उषाताई दादा खंजीरे, सांगली
✻ ५१,०००/- डॉ. पी. डी. पाटील माणगावकर
✻ ५१,०००/- श्री. सुरेश मोतीचंद्र मेहता, पेठ वडगाव
✻ ५१,०००/- श्री. धन्यकुमार रामचंद्र (डी. आर.) शहा, इंडी
✻ ५१,०००/- स्व. लक्ष्मीबाई वासुदेवराव आरवाडे यांचे स्मरणार्थ श्री. सनत्कुमार वासुदेवराव आरवाडे, सांगली
✻ ५१,०००/- स्व. चित्राबाई श्रीपाल मार्ले यांच्या स्मरणार्थ श्रीमती वात्सला सुरेंद्र अथणे, बाहुबली
✻ ५१,०००/- श्री. अजितकुमार गुलाबचंद शहा, शहा अँड कंपनी, सोलापूर
✻ ५१,०००/- स्व. निरंजन रतनलाल कळमकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती नयना निरंजन कळमकर, नाशिक
✻ ५१,०००/- सौ. सुनीता व श्री. जिनरत्न गणपतराव रोटे, कोल्हापूर
✻ ५०,००१/- स्व. आप्पासो अण्णाप्पा कासार बेनाडीकर यांच्या स्मरणार्थ श्री. योगेश विजय कासार
✻ ५०,०००/- इंदिरा श्रीकांत जोखे, कोल्हापूर

# प्रवचनसार : जीवनस्वातंत्र्याची कला

(लेख क्र. १३९)

आर्यिका १०५श्री शुद्धोऽहंश्री माताजी

**तपाचारासाठी संकल्प –**

कोणी विरक्त गृहस्थ स्वत:ला ओळखून आपल्या कल्याणासाठी घर सोडून वनवासी गुरूंच्या जवळ जात आहे. मार्गामध्येच असताना तो विचार करीत आहे की आता मला काय करायचे आहे ? घरदार तर मी सोडले, आता साधू होऊन अनेक प्रकारचे तप करून कर्माची निर्जरा करायची आहे. तपाचार बारा प्रकारचा आहे. अनशन, अवमौदर्य वृत्तिपरिसंस्थान, रसपरित्याग, विविक्तशयनासन, कायक्लेश हे ६ प्रकारचे अंतरंग तप आहेत. तपाचा उद्देश्य आहे. मन विकारामध्ये जाऊ नये. आणि विषयभोगाच्या भावनेमध्ये आसक्त होऊ नये. मनाला रोकण्यासाठी तपस्या. एक मुख्य साधन आहे.

**१) अनशन तप – अनशन म्हणजे उपवास.**

अन्न, खाद्य, लेह्य व पेय या चार प्रकारच्या आहाराचा त्याग करणे अनशन तप आहे. आहाराचा त्याग केल्यामुळे संयमाची सिध्दी होते, शरीराचे ममत्व सुटते, इन्द्रियामध्ये विकार होत नाही. प्रमाद उत्पन्न होत नाही. मनाची चंचलता कमी होते. त्यामुळे उपयोग आत्मस्वरूपामध्ये लीन होतो. त्यामुळे कर्माची निर्जरा होते. वास्तविक आत्मा अनशन स्वभावी आहे. उपवासाचा संकल्प, विकल्प करणे, धारणा–पारणा करणे हा सुध्दा आत्म्याचा स्वभाव नाही. आत्म्याचे स्वरूप तर जाणणे आहे. त्या आपल्या ध्रुव स्वभावामध्ये राहण्यासाठी ज्ञानी उपवास करतो. ज्ञानीला उपवासाची इच्छा नसते. जर असाताचा तीव्र उदय आला तर भूक लागते. भूकेची वेदना झाली तर उपयोग स्वभावामध्ये स्थिर राहू शकत नाही, म्हणून उपयोग शुध्द स्वभावामध्ये एकाग्र करण्याच्या इच्छेनेच ज्ञानी, आहार घेतो. जर भोजन न घेता उपयोग स्थिर राहू शकतो तर उपवास करतो. ज्ञानीला एक शुध्दोपयोगाद्वारे आत्म्यामध्ये रमण करण्याची इच्छा असते. भोजन करणे किंवा उपवास करणे दोन्ही राग आहे. माझा स्वभाव नाही, हे ज्ञानी जाणतो. तरी शुध्दात्म्याला प्राप्त करण्यासाठी उपवासाचे अवलंबन घेतो.

**२) अवमौदर्य तप –**

भुकेपेक्षा कमी आहार करणे अवमौदर्य तप आहे. उपवासापेक्षा जास्त कठीण अवमौदर्य तप आहे. आहार प्रथमच सोडला असेल व आहार घेण्यासाठी गेलाच नाही तर इच्छेचा निरोध सहज होतो, पण आहार घेण्यासाठी जाणे व सर्व भोजन सामग्री उपलब्ध असताना सुध्दा अर्ध्यातून आहार सोडणे यामध्ये इच्छेचा अधिक निरोध होतो.

अवमौदर्य तपामुळे अजीर्णादि रोग उत्पन्न होत नाही, ध्यान स्वाध्यायाची वृध्दी होते, आत्मस्वरूपामध्ये सावधानी राहते, झोप येत नाही. इन्द्रियावर विजय प्राप्त होतो, प्रमाद आळस उत्पन्न होत नाही. परिणामांची विशुध्दी वाढते, म्हणून ज्ञानी या तपाचे अवलंबन घेतो. जो जाणतो की हे एक मोक्षमार्गाचे (आत्मसाधनेचे) साधन आहे. म्हणून जोपर्यंत मुक्ती प्राप्त होत नाही तोपर्यंत याचे पालन करतो, परंतु हा सुध्दा शुभराग आहे.

**३) वृत्तिपरिसंख्यान तप –**

गल्ली, घर, आहार, पात्र किंवा दात्याचा नियम घेऊन आहारासाठी निघणे हे वृत्तिपरिसंख्यान तप आहे. आज या गल्लीमध्ये किंवा चाळीमध्ये आहार मिळाला तर मी आहार ग्रहण करेन अन्यथा करणार नाही, हे मार्ग परिसंख्यान आहे. आज या घरात अथवा या ५–६ घरामध्ये आहार मिळाला तर आहार करेन, हे गृह परिसंख्यान आहे. प्रथम

ताटामध्ये डाळ, भात, भाकरी, भाजी इत्यादी पैकी जी वस्तू येईल तीच मी ग्रहण करेन इत्यादी वस्तु विशेषाचा नियम करणे, आहार परिसंख्यान आहे. आज सोने, पीतळ, चांदी, तांबे, माती इत्यादी अमुक विशिष्ट पात्रामध्ये आहार मिळाला तर आहार ग्रहण करेन, हे भोजन परिसंख्यान आहे. वृध्द, युवा, कुमार, कुमारिका, स्त्री, पुरुष इत्यादी व्यक्ति-विशेष नियम घेणे दातृपरिसंख्यान आहे. आपल्या कर्मांची परीक्षा करण्यासाठी आणि आहार करावा की नाही असा विकल्प झाला तर तो मिटविण्यासाठी साधु वृत्तिपरिसंख्यान तप करतात. इन्द्रियांचे दमन, कषायावर विजय, शरीराचे ममत्व दूर करणे, जिनधर्माची प्रभावना, तृष्णेचा उच्छेद व दीनभावनेचा त्याग करणे इत्यादी प्रयोजनासाठी वृत्तिपरिसंख्यान तप केले जाते.

**४) रसपरित्याग तप –**

दही, दूध, तूप, तेल, साखर व लोण या सहा रसांपैकी काही रसांचा किंवा सर्व रसांचा त्याग करणे रसपरित्याग तप आहे. इन्द्रियांना वश करण्यासाठी इच्छेला रोकण्यासाठी, कामविकारावर विजय प्राप्त करण्यासाठी मुनिराज रसपरित्याग करतात. या तपामुळे सात्त्विक वृत्ती वाढते, मोक्षमार्गामध्ये प्रवृत्ती होते. कसाही आहार मिळाला तर त्यामध्ये संतोषवृत्ती वाढते.

**५) विविक्त शय्यासन तप –**

अध्ययन व ध्यानामध्ये बाधा होऊ नये म्हणून एकान्त शून्य स्थानामध्ये बसणे किंवा झोपणे, विविक्त शय्यासन नावाचे तप आहे. स्त्री, नपुंसक, पशू, पक्षी, क्षुद्र प्राण्यांचा जेथे वास नाही असे झाडाचे कोटर, शून्यघर, उपवनाची भूमी, पर्वत, गुहा इत्यादी विविक्त स्थान आहे. विविक्त शय्यासनामुळे रागद्वेषांची उत्पत्ती होत नाही. एकान्तवासामुळे परिणामांची विशुध्दी होते. उपयोग शुध्दस्वभावामध्ये एकाग्र होतो म्हणून विशेष ध्यान व अध्ययनाच्या सिध्दीसाठी मुनिराज एकान्त वासाची इच्छा करतात, हे एक उत्कृष्ट तप आहे.

**६) कायक्लेश तप –**

सुखपूर्वक लालन पालन केलेले शरीर सद्ध्यानाच्या सिध्दीसाठी समर्थ होत नाही, म्हणून जिनेन्द्रदेवांनी सांगितलेल्या क्लेशांच्या द्वारे शरीराचे दमन करणे व आपल्या स्वाधीन करणे कायक्लेश तप आहे. उन्हाळ्यामध्ये पर्वताच्या शिखरावर उभे राहून ध्यान करणे, थंडीच्या दिवसात नदीच्या कडेला तप करणे व पावसाळ्यात झाडाखाली उभे राहून तप करणे कायक्लेश तप आहे. सुखिया जीव उन्हाळ्यात कुलर, ए. सी. पंखा यांचे सेवन करून सुध्दा सुखाचा अनुभव करीत नाहीत. परंतु संतान उन्हामध्ये उभे राहून मुनिराज आत्मानन्दामध्ये तृप्त होतात व शांत स्वभावाचा अनुभव करतात. थंडीच्या दिवसात स्वेटर रजई ओढून हिटर लावून सुध्दा सुखिया जीव दुःखाचा अनुभव करतात. पण मुनिराज आपल्या आत्मगुफेमध्ये गुप्त होऊन ध्यानरूपी अग्नीमध्ये कर्मरूपी इंधन जाळून टाकतात व संतोषामृताचे सेवन करतात. कायक्लेश तप केल्यामुळे सुखिया स्वभाव नष्ट होतो व परीषह, उपसर्गावर सहज विजय प्राप्त करता येतो. हे शरीर अनादिकाळाचा शत्रू आहे याने पूर्वी मला खूप दुःख दिले आहे. आता याचे मर्दन करणेच योग्य आहे असे जाणून मुनिराज घोर तपश्चरणाच्या द्वारे कायक्लेश तप करतात. वीरासन, वज्रासन, गवासन, हस्तिशुण्डासन, दंडशय्या, धनुरासन इत्यादी आसनामध्ये स्थित होऊन ध्यान करणे कायक्लेश तप आहे.

हे सहा प्रकारचे बाह्य तप आत्म्याचा स्वभाव नाही पण आत्मसाधनेसाठी बाह्य साधनभूत आहे म्हणून ज्ञानी याचे आत्मसिध्दीसाठी अवलंबन घेतो.

**अंतरंग तप – ७) प्रायश्चित**

अंतरंग तप आपल्या आत्म्याच्या भावांद्वारे आतल्या आत केले जाते. यांचा संबंध अंतरंग परिणामाशी आहे. बाह्यक्रियेशी नाही. वरील ६ तप बाहेरून लोकांना दिसतात. त्यामुळे लोक जाणतात की हा तपस्वी आहे. बाह्य क्रियेशी यांचा संबंध आहे व लौकिक जैन मत बाह्य अन्य लोकही या तपांचे सेवन करतात, म्हणून यांना बाह्य तप म्हणतात. अंतरंग तप बाहेरून लोकांना दिसून येत नाही.

अंतरंग परिणामांशी यांचा संबंध आहे व अन्य लोकांच्याकडून याचे सेवन केले जात नाही, म्हणून यांना अंतरंग तप म्हणतात.

प्रमाद अथवा अज्ञान जन्य दोषांचे निराकरण करून आपल्या मनाला शुध्द करणे प्रायश्चित आहे. पापरूप क्रिया व परिणाम यांचा पश्चात्ताप करणे प्रायश्चित आहे. अनादिकाळापासून मोहराग–द्वेषाच्या वश होऊन हा जीव घोर पाप करत आला आहे. आता त्या पापापासून वाचण्यासाठी ज्ञानी भूतकाळात घडलेल्या पापांचे प्रतिक्रमण करतो. काही पापी जीव प्रायश्चिताच्या परिणामाने अत्यन्त निर्मलता प्राप्त करून अन्तर्मुहूर्तामध्ये मोक्ष मार्गाला प्राप्त करून मोक्षाला पण गेले.

आलोचना, प्रतिक्रमण, उभय, विवेक, व्युत्सर्ग, तप, छेद: मूल, परिहार आणि श्रध्दान अशा प्रकारे प्रायश्चित्ताचे दहा भेद आहेत.

१) आलोचना – जो श्रुताच्या रहस्याला जाणतो व ज्याचे मन अत्यन्त शान्त आहे, जे अपरिव्यक्त (शिष्याने सांगितलेले दोष दुसऱ्यापुढे न सांगणे) आहेत अशा आचार्यांजवळ एकांतामध्ये जाऊन त्यांच्या डाव्या बाजूला बसून आपल्या दोषांची शुध्दी करण्यासाठी मायाचार सोडून विनयाने बालकाप्रमाणे आपल्या दोषांची निंदा–गर्हा करणे आलोचना प्रायश्चित्त आहे.

२) प्रतिक्रमण – अल्प अपराध घडला असता 'माझे अपराध मिथ्या होवोत' अशाप्रकारच्या वचनाने स्वयं स्वत:मध्ये निंदा गर्हा करणे प्रतिक्रमण प्रायश्चित आहे.

३) उभय – जेथे आलोचना व प्रतिक्रमण दोन्ही केले जातात त्यास उभय प्रायश्चित्त म्हणतात. मुनिराज दु:स्वप्न, मानसिक दुष्ट विचार, चिन्तादी महादोष उत्पन्न झाल्यावर प्रतिक्रमण आणि आलोचना दोन्ही करतात.

४) विवेक – जी वस्तू अप्रासुक अथवा अभक्ष्य आहे अथवा सोडलेल्या वस्तूचे प्रमादाने किंवा विस्मरणाने त्या वस्तूचे सेवन केले तर स्मरण झाल्यावर त्या वस्तू सोडून देणे विवेक प्रायश्चित्त आहे. अथवा ज्या वस्तूमध्ये अभक्ष्य किंवा सोडलेली वस्तू मिसळली असेल त्याला वेगळे करणे शक्य नाही त्या वस्तूचा त्याग करणे सुध्दा विवेक प्रायश्चित्त आहे.

५) व्युत्सर्ग – मलमूत्रादिकांचे विसर्जन केल्यावर अथवा नदी आदी पार केल्यावर अन्तर्मुहूर्तादिकाळापर्यंत शरीराच्या ममत्वाचा त्याग करून सद्‌ध्यान करणे व्युत्सर्ग आहे.

६) तप – अहिंसा आदी व्रतांमध्ये अतिचार दोष लागल्यावर अनशनादी सहा प्रकारचे बहिरंग तप करून आत्मशुध्दी करणे तप नावाचे प्रायश्चित्त आहे.

७) छेद – चिरकालापासून दीक्षित साधू अभिमानी होऊन आपल्या व्रतामध्ये दूषण लावतो तर त्याच्या एक पक्ष, महिना, काही दिवसासाठी दीक्षेचा छेद करणे छेद प्रायश्चित्त आहे.

८) मूल – पूर्वीची संपूर्ण दीक्षा छेद करून पुन: दीक्षा देणे मूल नावाचे प्रायश्चित्त आहे. हे प्रायश्चित्त उन्मार्गगामी पार्श्वस्थ आदी महादोषी मुनींनाच दिले जाते.

९) परिहार – आपल्या संघातून बहिष्कृत करणे. आपल्या संघाच्या वसतिकेपासून ३२ धनुष्य दूर ठेवणे परिहार आहे. अथवा आचार्यांच्या जवळ जाऊन आलोचना करतो तरीसुध्दा त्याला कोणतेही आचार्य प्रायश्चित्त देत नाहीत. पुन: आपल्या आचार्यांजवळ येतो. तेव्हा आचार्य प्रायश्चित्त देतात.

१०) श्रध्दान – कोणत्यातरी कारणाने मिथ्यात्व अवस्थेला प्राप्त होऊन मुनी पुन्हा तत्त्व श्रध्दानाला प्राप्त होतो त्यास श्रध्दान (दर्शन) प्रायश्चित्त म्हणतात.

ज्याप्रमाणे वैद्य रोगीच्या रोगाची शक्ती आदी जाणून त्याचा रोग दूर करण्यासाठी औषध देतो त्याप्रमाणे आचार्य साधूच्या अल्प किंवा महान् दोषांना जाणून सेवन केल्याशिवाय रोगाचे निष्कासन होत नाही. त्याच प्रमाणे प्रायश्चित्ताशिवाय पापांचे प्रक्षालन होत नाही.

गृहस्थानेसुध्दा दररोज प्रायश्चित्त करावे. रात्रंदिवस आपण केलेल्या कार्यांचा विचार करावा. मी आज कोणते खोटे काम केले ? कोणत्या जीवाला त्रास दिला. मी आज कोणाशी खोटे बोललो, कुणाचे धन हडप केले, कोणत्या स्त्रीचे रूप पाहून मन विचलित केले. धन संपत्तीचा संचय करण्यामध्ये किती आसक्ती केली? आपल्या दोषांचे निरीक्षण करून प्रायश्चित करावे. गुरू असतील त्यांच्याकडून प्रायश्चित्त घ्यावे. त्यामुळे आत्म्याची शुध्दी होते. प्रायश्चित्त करणे हा सुध्दा शुभभाव आहे. आत्म्याचा स्वभाव नाही. परंतु आत्म्याच्या शुध्दीकरणाचे बाह्यसाधन आहे; म्हणून ज्ञानी खालच्या भूमिकेत याचे अवलंबन घेतो.

**८) विनय तप –**

नम्र–वृत्ती विनय आहे. **'स्वर्गमोक्षादीन् विशेषेण नयतीति विनयः।** जो जीवाला स्वर्गमोक्षादिकाकडे विशेष रूपाने नेतो तो विनय होय. सम्यग्दर्शन विनय, सम्यग्ज्ञान विनय, चारित्र विनय, तप विनय व उपचार विनय असा पाच प्रकारचा विनय आहे. सम्यग्दर्शनाच्या शंकादी दोषांचा त्याग करणे सम्यग्दर्शन विनय आहे. मागे सांगितलेल्या ज्ञानाचाराच्या आठ अंगांचे पालन करणे ज्ञान विनय आहे. निर्दोष आवश्यक क्रियांचे पालन करणे. बारा प्रकारच्या तपामध्ये आदरभाव ठेवणे, तपस्वींच्या प्रति प्रमोदभाव ठेवणे, तपोविनय आहे. १३ प्रकारचे चारित्र धारण करण्यामध्ये त्याचे निरतिचार पालन करण्यामध्ये आदरभाव असणे. चारित्रशाली मुनींची भक्ती करणे. जधन्य चारित्रधारीची निंदा न करणे. परीषह उपस्थित झाल्यावर त्यावर विजय प्राप्त करण्यासाठी तत्पर राहणे, चारित्र विनय आहे. उप म्हणजे जवळ, जवळ जाऊन जो यथोचित सत्कार केला जातो तो उपचार विनय आहे.

आपल्याला पूज्य पुरुषांना पाहून उठून उभे रहावे, थोडे पुढे जाऊन त्यांची अगवानी करावी. जेव्हा ते चालतात तेव्हा त्यांच्या मागून चालावे किंवा बरोबर चाललो तर त्यांच्या डाव्या बाजूने चालावे. ते बसल्यावर त्यांच्यापेक्षा खालच्या स्थानावर बसावे. नम्रशब्दांमध्ये क्षेम कुशल विचारावे. त्यांना अनुकुल वचन बोलावे. आचार्यांच्या प्रती मनामध्ये प्रमोद भाव त्यांच्या गुणामध्ये अनुराग असावा.

विनयामध्ये पुष्कळ गुण वास करतात. विनयाच्या प्रसादाने गुणांचा विकास होतो. विनयाशिवाय कोणतीच विद्या प्राप्त होऊ शकत नाही. छोटा असो, मोठा असो, सर्वांच्या बरोबर यथायोग्य विनयाचा व्यवहार असावा.

विनयामुळे जिनेन्द्र भगवंतांच्या आज्ञेचे पालन होते. जगामध्ये निर्मल सत्कीर्तीरूपी लता पसरते. सर्वजणांशी मैत्री भाव प्रगट होतो. मान कषायाचा नाश होतो चतुर्विध संघ विनयशील मनुष्यावर संतुष्ट होतात. इत्यादी विनयाचे अनेक गुण आहेत. जास्त काय सांगायचे. विनय सर्व इष्ट सम्पदांचे स्थान आहे. रत्नत्रयाचा अलंकार आहे आणि मुक्तीचे कारण आहे.

**९) वैय्यावृत्त्य तप –**

विरक्त साधू पुरुषांची सेवा करणे, वैय्यावृत्य तप आहे. वैय्यावृत्य म्हणजे व्यावृत्त पुरुषाचे कार्य, आचार्य, उपाध्याय, तपस्वी, शिकणारे साधू, रोगाने पीडित ग्लान साधू, वृध्द, संघातील साधूंची सेवा करणे वैय्यावृत्त्य आहे. जर ते थकले असतील तर त्यांचे पाय दाबून त्यांचा थकवा दूर करावा. त्यांची काही आवश्यकता असतील तर त्या आवश्यकतांची पूर्ती करावी. ज्या प्रकाराने त्यांना आराम मिळेल व त्यांची मोक्षमार्गामध्ये प्रगती होऊ शकेल तशाप्रकारे त्यांची सेवा करावी. 'सेवा का फल मेवा' असे म्हटले आहे. मोठ्या पुरुषांची सेवा केली तर कधी ना कधी ज्ञानाचा प्रकाश व सिध्दालय अवश्य होणार. निरपेक्ष, निःस्पृह वृत्तीने सेवा केली तर त्याचे चांगले फळ प्राप्त होते.

मुनींना रोगपरीषह उपसर्ग आदी उपद्रव झाल्यावर प्रासुक औषध, पान, आवास, धर्मोपकरण आदींच्याद्वारे प्रतीकार करणे तसेच संयम व सम्यक्त्वापासून च्युत झाल्यावर त्यांना संयम व

सम्यक्त्वामध्ये दृढ करणे वैयावृत्य आहे. प्रत्युपकाराच्या अपेक्षा न करता आपल्या हातांनी मल, मूत्र, कप, नाकातील मल दूर करणे, त्यांना प्रयत्नपूर्वक उठविणे, बसविणे, करवट बदलणे आदिसुद्धा वैय्यावृत्ती आहे. वैय्यावृत्य करणाऱ्याला निर्जुगुप्सा गुण प्रगट होतो कारण निर्जुगुप्सेशिवाय वैय्यावृत्य होत नाही. वात्सल्यभाव प्रगट होतो. पवित्र यश सर्वत्र पसरते. स्वर्गसंपदा व मुक्तिसुख प्राप्त होते. वैय्यावृत्त हा सुद्धा शुभराग आहे. आत्म्याचा स्वभाव नाही तरीसुद्धा साधक पुरुष आत्मस्वभावाच्या स्थिरतेच्या अभावामध्ये याचे अवलंबन घेतो.

**१०) स्वाध्याय –**

आत्महितकारी शास्त्र वाचणे स्वाध्याय आहे. स्वत:चे अध्ययन करून आत्मकल्याण साधणे स्वाध्याय आहे. बारा प्रकारच्या तपामध्ये स्वाध्यायासारखे दूसरे तप नाही. ध्यान अन्तर्मुहूर्तापेक्षा अधिक काळ होऊ शकत नाही, परन्तु स्वाध्याय दीर्घकाळ करू शकतो तो पापाच्या निर्जरेचे कारण आहे.

स्वाध्याय परम ध्यान आहे कारण स्वाध्याय करताना मन समीचीन अर्थाच्या विचार करण्यामध्ये लागते. वचन पाठ करण्यामध्ये लागते. वचन पाठ करण्यामध्ये, डोळे वर्ण (अक्षर) पाहण्यामध्ये, कान शब्द ऐकण्यामध्ये लीन होते तसेच सर्व इन्द्रिये निष्क्रिय होतात. स्वाध्यायामध्ये पूर्ण एकाग्रता होते म्हणून स्वाध्याय परम तप आहे. स्वाध्यायामुळे तत्त्वांचा अभ्यास, प्रशमभाव, वैराग्याची उत्पत्ती होते, स्वाध्यायाच्या बलाने एकांतवादींच्या मानाचे मर्दन करण्याची शक्ती प्राप्त होते तसेच धर्माची प्रभावना होते.

स्वाध्याय पाच प्रकारचा आहे. ग्रंथ वाचणे, ऐकणे हे वाचना स्वाध्याय आहे. काही शंका उपस्थित झाल्या असता प्रश्न विचारणे पृच्छना स्वाध्याय आहे. काही श्लोक, सूत्रादी पाठ करणे घोकणे हा आम्नाय स्वाध्याय आहे. तत्त्वाचा यथार्थ उपदेश देणे धर्मोपदेश नावाचा स्वाध्याय आहे.

स्वाध्याय आत्म्याचा हितकारी आहे. तरीपण त्यामध्ये मन-वचन-कायेची कोणती ना कोणती प्रवृत्ती आहे. कोणत्याही प्रकारची प्रवृत्ती करणे आत्म्याचा स्वभाव नाही. तरी देखील शुध्दात्म्याच्या प्राप्तीचा उपाय स्वाध्याय आहे, म्हणून आत्मस्वभावाच्या प्राप्तीसाठी साधक पुरूष याचा आधार घेतो. स्वाध्यायामुळे विषय कषायांचा परिणाम समाप्त होतो त्यामुळे ज्ञान प्रकाश वाढतो, म्हणून स्वाध्याय पवित्र तप आहे.

**११) व्युत्सर्ग तप –**

उपाधींच्या ममत्वाचा त्याग करणे व्युत्सर्ग तप आहे. उपधी म्हणजे परिग्रह उपधी दोन प्रकारची आहे. १) बाह्य उपधी २) अंतरंग उपधी. घर परिवार, कुटुंब, शरीर, कर्म जे आत्म्यापासून भिन्न आहेत ही बाह्य उपधी आहे. रागद्वेषादी विकारी परिणाम अंतरंग उपधी आहे. दोन्ही प्रकारच्या उपधीचा त्याग करणे व्युसर्ग तप आहे.

बाह्य पदार्थ तर आत्म्यापासून प्रत्यक्ष भिन्नच आहेत. अंतरंगामध्ये उठणारे रागादी विकल्प तरंग सुध्दा आत्म्याचे स्वरूप नाही. ते आत्म्याचा घात करीत आहेत. रागद्वेषामुळे विकारी भासत सर्वोत्कृष्ट अनंतचतुष्टय रूपी लक्ष्मी झाकली गेली आहे. म्हणून दोन्ही प्रकारच्या उपधीचा त्याग होणे आवश्यक आहे. त्यांची उपेक्षा करणे. त्यापासून आपला उपयोग हटवणे हाच त्यांचा त्याग आहे. व्युत्सर्ग मुनींच्या ध्यानाच्या सिध्दीचे कारण आहे म्हणून विरक्त पुरुष जोपर्यंत आत्मस्वभावाची उपलब्धी होत नाही तोपर्यंत याचा आश्रय घेतात.

**१२) ध्यान तप –**

चित्त एका अर्थामध्ये अंतर्मुहूर्तापर्यंत एकाग्र होणे ध्यान आहे. धर्मध्यान व शुक्लध्यान मोक्षाचे साधन आहे. ध्यान हे सर्वात उत्कृष्ट तप आहे. अन्य ११ तप या ध्यानाच्या सिध्दी साठीच कारणीभूत आहेत. ध्यानरूपी अग्नीमध्ये आत्मा कर्मरूपी इंधन जाळून टाकतो. ध्यान हे साक्षात कर्मनिर्जरेचे साधन आहे. ध्यान चैतन्य स्वरूपामध्ये उपयोग लीन करण्यासाठी साधनभूत आहे. एवढा उत्कृष्ट उपाय

असूनसुध्दा शेवटी ही एक मनाचीच वृत्ती आहे. मनाची स्थिर वृत्तीच ध्यान आहे. म्हणून ध्यान आत्म्याचे कोणी नाही. हे साधक जाणतो तरीपण ध्यानाच्या प्रसादाने शुध्दात्म्याची प्राप्ती करण्यासाठी ध्यानाचे अवलंबन घेतो.

संसार, भोगापासून विरक्त संत, तपाचाराचा आश्रय घेण्यासाठी आचार्याजवळ चालला आहे. परंतु तो जाणतो की मी तोपर्यंतच या तपाचाराचे अवलंबन घेतो जोपर्यंत याच्या प्रसादाने शुध्दात्म्याची प्राप्ती होत नाही.

**५) वीर्याचाराच्या प्रती ज्ञानीचा संकल्प –**

धर्माच्या कामामध्ये, व्रतनियम साधण्यामध्ये, ज्ञानदर्शनचारित्र गुणांची साधना करण्यामध्ये आपली शक्ती न लपविणे आणि उत्साहपूर्वक आचारांचे परिपूर्ण साधन करणे वीर्याचार आहे. वास्तविक ज्ञान, दर्शन, चारित्र व तप अशा प्रकारे चार प्रकारचा आचार आहे. त्या चार आचारांमध्ये प्रवृत्ती करविणारा वीर्याचार आहे. आपली शक्ती न लपविता त्या आचारांचे पालन करणे वीर्याचार आहे. वीर्याचार कोणता स्वतंत्र आचार नाही. परीषहांवर विजय, दशलक्षण धर्मांचे पालन, ६ आवश्यक कर्तव्यांचे पालन, आणखीन जितके आचरण आहेत त्या आचरणांमध्ये आपल्या शक्तीनुसार पूर्ण उत्साहाने प्रवृत्ती करणे हाच वीर्याचार आहे. जरी वीर्याचार पवित्र आचार आहे. याच्या प्रतापाचे मोक्षमार्गामध्ये प्रवृत्ती होते तरीसुध्दा ज्ञानी विचार करतो, हे वीर्याचार ! शुध्दात्म्याचा तू कोणी नाहीस शुध्द आत्मा सर्व परपदार्थापासून व परभावापासून भिन्न आहे. ज्ञाता-द्रष्टा राहणे आत्म्याचा स्वभाव आहे. या शांत समूहामध्ये विकल्पतरंग उठतात पण तो आत्मसमुद्राचा स्वभाव नाही. संसार मार्गातील अशुभ विकल्प तरंगे असो की मोक्षमार्गातील शुभ तरंगे असोत कोणत्याही प्रकारची विकल्प तरंग उठणे शुध्द आत्म्याची वृत्ती नाही, म्हणून वीर्याचार माझा स्वभाव नाही, परंतु या वीर्याचाराच्या कृपेने शुध्द आत्मस्वभावाची उपलब्धी होते, म्हणून मी तुला तोपर्यंत ग्रहण करतो की जोपर्यंत तुझ्या कृपेने मी शुध्दात्म्याला प्राप्त करीत नाही.

अशाप्रकारे घर-परिवार, बंधुवर्गांचा निरोप घेऊन, त्यांना सोडून कोणत्या तरी योग्य आचार्यांच्याजवळ दीक्षा ग्रहण करण्यासाठी जात असताना विरक्त पुरुष या पंचाचारांना ग्रहण करण्याचा संकल्प करतो.

**( क्रमशः )**

---

## बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर बाहुबली येथे बाल आनंद मेळावा संपन्न

बालदिन हा आनंदाचा, निखळ हसण्याचा आणि निरागसतेचा दिवस आहे. याच कारणाने बालविकास व प्राथमिक विद्यामंदिर बाहुबली येथे १४ नोव्हेंबर २०२५ रोजी बाल दिनानिमित्त बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. बाल आनंद मेळाव्याची सुरुवात पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनीता पाटील मॅडम यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सर्व विद्यार्थ्यांना बाल दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर विद्यार्थी मनोगते झाली. अध्यापिका मनोगत सौ. अनिता कागवाडे मॅडम यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या गोष्टी सांगून त्यांच्याविषयी अधिक माहिती मुलांना दिली. वेध भविष्याच्या स्पर्धा परीक्षा विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान केला. यानंतर विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले. यामध्ये कथक नृत्य, गाणी, गोष्टी, शाब्दिक कोडी, बालगीतांवर आधारित नृत्य, सोलो डान्स, शिवाजी महाराजांच्या वर नृत्य, ग्रुप डान्स विद्यार्थ्यांनी सादर केले. सर्व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना देण्यास हा बाल आनंद मेळावा फायदेशीरच ठरला.

या कार्यक्रमाचे आभार सौ. माधुरी मगदूम यांनी मानले व सूत्रसंचालन सौ. पूनम लांडे यांनी केले. या बाल आनंद मेळाव्यासाठी शाळेचे अध्यक्ष मा. श्री. तात्यासो अथणे सर, शालेय समिती सदस्य मा. श्री. गोमटेश बेडगे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# योगसार चिंतन

(लेखांक १०)

**प्रियदर्शन जैन, नागपूर**

**जो जिणु सो अप्पा, मुणहु इह सिद्धंतहु सारु ।**
**इह जाणीविण, जोयईहु छंडहु मायाचारु ।२१।**
**जो परमप्पा सो जि हउं, जे हउं सो परमप्पु ।**
**इउ जाणेविणु जोइआ, अण्णु म करहु वियप्पु ।२२।**

अर्थ–जो जिनेंद्र आहे तोच हा आत्मा आहे, हाच सर्व सिद्धान्ताचा सार आहे. हे योगीजनांनो! हे जाणून मायाचाराचा त्याग करा.।२१।
अर्थ – 'हे योगी! जो परमात्मा आहे तोच मी आहे आणि जो मी आहे तोच परमात्मा आहे' –सर्व विकल्पांचा त्याग करून याचा स्वीकार कर. ।२२।

२१) सर्वज्ञ भगवंत म्हणतात की, 'जसा मी आहे तसाच तू पण आहेस! जिनेंद्र व आत्मा यांच्यामध्ये काहीच भेद नाही. तू याचेच मनन कर....!

आचार्यदेव येथे स्वभावाच्या अपेक्षेने कथन करतात, ते सांगतात, 'तुझे स्वरूप जिनेन्द्रासमानच आहे... याचेच चिंतन कर... सर्व सिद्धांताचा हाच एकमेव सार आहे!' 'मी स्वयं द्रव्यस्वरूप परमेश्वरच आहे', हा विश्वास ज्याचे ठायी प्रगटतो, तो भविष्यात पूर्ण वीतराग दशेला प्राप्त होतोच.'मी अल्पज्ञानी आहे' –असे म्हणणे हाच मायाचार आहे, याचा तू त्याग कर असे आचार्य येथे सांगत आहेत. ज्याच्या आश्रयाने भगवान बनले जाते. त्या आत्म्याचे सामर्थ्य तर पहा...! रागाने, विकल्पांनी किंवा क्रियांनी स्वतःला मोठे मानणे सोडून दे.

पं. बनारसीदासजी म्हणतात,
**जिन सो ही है आत्मा, अन्य सो ही है कर्म ।**
**ये ही वचन से समझ ले, जिन–वचन का मर्म ।।**

'जिन म्हणजेच आत्मा आहे, बाकी सारे कर्म!'– या वचनात सर्व जिनवाणीचे रहस्य सामावले आहे. ज्या कर्म–संयोगाने तू स्वतःला मोठा समजत आहेस, ती मान्यता मिथ्या आहे.... त्याचा त्याग कर....सर्वप्रथम मी परमात्मा आहे, याचा निश्चय कर!

प्रथमात प्रथम तर आपल्याला आपल्या स्वरूपाचा निर्णय तर करावाच लागेल.. त्याशिवाय आपण त्यास प्राप्त कसे करणार? स्वतःच्या परमात्म स्वरूपाला स्वीकारताच सर्व पामरता आपोआपच लयास पावते. माझे स्वरूप जिनेंद्रासमानच आहे. याचेच सतत चिंतन–मनन सहज रूपाने चालले पाहिजे. जोपर्यन्त हा निर्णय पक्का होणार नाही, तोपर्यन्त आपला व्यवहार सुद्धा यथार्थ व्यवहार होणार नाही. म्हणतातच ना–'निश्चयाच्या यथार्थ निर्णयाशिवाय व्यवहार सुद्धा यथार्थ पदवीला प्राप्त होत नाही.'

जो दृष्टी अपेक्षेने वीतराग झाला, तो स्थिरतेच्या अपेक्षेने अल्प काळातच वीतराग दशेस प्राप्त होईल, असे आचार्यदेव या गाथेत सांगत आहेत. किती करुणेने आचार्य एकच एक पण अत्यंत मोलाची गोष्ट वारंवार या गाथांमध्ये सांगत आहेत! ते म्हणतात, 'हे योगीजन! तुम्ही मायाचाराचा त्याग करा आणि या सत्याचा स्वीकार करा.येथे मायाचाराचा अर्थ काय घ्यावा.... तर मी अल्पज्ञ.. मी क्रोधी..मी मानी, मी कर्ता, मी भोक्ता.. इत्यादी भावांना ग्रहण करून रागरूपी क्रियांचा आश्रय घेणे.

आपण आपल्यास आत्मा न मानणे हा सर्वांत मोठा मायाचार आहे. समस्त मोक्षमार्गाचे आश्रयस्थान आपला स्वभावच आहे. स्वभाव म्हणजे आपला आत्मा. तो जिनस्वरूपी आहे. एकमेव त्याच्याच आश्रयाने सर्व विकल्प आपोआप विलयास प्राप्त होतात. या गाथेच्या शब्दांना

बीजरूपाने आपल्या अंतरंगात आताच पेरावे लागेल. त्यामुळे अकर्तृत्वभावाचे सृजन होऊन शान्तिरूपी वृक्ष पल्लवित होऊन शान्तीचा उद्गम होईल.

२२) आचार्यदेव येथे सांगत आहेत, 'परमार्थाने परमात्म्यात आणि तुझ्यात काहीही अंतर नाही, हे सत्य तू आपल्या अंतरी कोरून ठेव. तेहतीस सागरपर्यंत सर्वार्थसिद्धीचे देव ज्याची चर्चा करतात, असे तू एकमेव तत्त्व आहेस. तू म्हणतोस की, तुझ्यात शक्ती नाही. परंतु सत्य तर हे आहे की, तुला तुझ्या शक्तीचा विश्वासच नाही. ती तर भगवंतासमानच आहे. किंचितही कमी नाही. तुझे स्वरूप हे परमात्म स्वरूप आहे, हे आगम वचन आहे. विचार कर, जर स्वभावात परमात्मपद नसते तर पर्यायामध्ये कुठून प्रगट झाले असते..?

'विकल्प हे अकिंचित्कर असतात'- या सत्याचा स्वीकार कर. कोणताच विकल्प कार्यकारी नसतो हे समजून घे. प्रत्येक वेळेस आपण जसे ठरवितो तसं घडतं का? नाही ना ?.. आणि कधी-कधी आपण ठरविल्याप्रमाणे घडतही असेल तर, तो निमित-नैमित्तिक संबंध समजावा. कोणताही विकल्प असो तो बंधासच कारण असतो. कुणी म्हणेल मग काहीच करायचे नाही काय??... आचार्यदेव येथे सांगू इच्छितात, 'व्यवहार हा परलक्ष्याने होत असतो. भूमिकेनुसार विकल्प येतातच. आल्याशिवाय राहणार नाहीत. कारण जोपर्यंत आत्मा आपल्या पूर्ण दशेला प्राप्त होत नाही तो पर्यंत विविध भाव (विकल्प) होणारच. म्हणूनच व्यवहाराचे अस्तित्व असते. जर त्याला नाकारले तर जीव मिथ्यादृष्टी होईल. आणि व्यवहारालाच परमार्थाने पूज्य मानले तर तो देखील मिथ्यादृष्टीच म्हटला जाईल...'

ज्याला आत्मदृष्टी नाही त्याचा सारा व्यवहार हा मिथ्यापदास प्राप्त होतो. आत्मतत्त्वाच्या आश्रयाशिवाय होणारे सर्व विकल्प मोक्षमार्ग या संज्ञेस पात्र नसतात. येथे खूपच सारगर्भित कथन आचार्यदेव करीत आहेत! सर्व लोकात ज्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही, अशा आपल्या आत्मतत्त्वाचा आश्रय घेण्यासाठी ते वारंवार सांगत आहेत..अशा या आत्मतत्त्वाची श्रद्धा-ज्ञान आणि बहुमानाशिवाय होणारे सर्व शुभभाव सुद्धा धर्म नाहीत, हे मर्म ते सांगत आहेत.

तर मग काय करायचे? असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. तर याकरिता आचार्यदेव सांगतात की, तत्त्व अभ्यास (सम्यक् स्वाध्याय), तत्त्वनिर्णय (सम्यक् श्रद्धान), तत्त्व विचार (सम्यक् चिंतन) करून भेदज्ञानपूर्वक ज्ञायक बनून आपल्या ज्ञान स्वरूपास जाणण्याचा आणि त्यातच रमण्याचा सतत पुरुषार्थ केला पाहिजे. हे मोक्षमार्गी जीवाचे मुख्य कर्तव्य असायला पाहिजे. हाच खरा धर्म आहे. जसजसा तत्त्व अभ्यास आणि तत्त्वचिंतन वाढत जाईल, तसतसे वैभविक भाव आपोआप कमी कमी होत जातील.

आचार्यदेव सांगू इच्छितात, 'खरोखरच तुझा आत्मा स्वयंभू आहे. तो स्वतः परापासून निरपेक्ष राहून दर्शन-ज्ञान-चारित्र रूपाने परिणमित होत असतो. तो त्याचा स्वभाव आहे. त्या स्वभावाच्या आश्रयाने तो स्वतः अंतरात्मा बनतो आणि त्यातच मग्न होऊन मग परमात्मदशेला प्राप्त होतो. फक्त गरज आहे त्याची शक्ती ओळखण्याची. ती तर साक्षात भगवंतासमानच आहे. किंचितही कमी नाही. परंतु तू अज्ञानदशेत विभावरूपाने परिणमित होऊन आपल्या स्वभावास विसरला आहेस. जागा हो ! आगम अभ्यास कर. स्वाध्याय (स्व अध्ययन) करून स्वतःचा यथार्थ परिचय करून घे. परमार्थाने (निश्चयनयाने) आहे त्या अवस्थेतही तुझे स्वरूप शुद्ध आहे.

आचार्य अमृतचंद्र देव समयसार ग्रंथाधिराजाची टीका लिहिताना एक सुंदर अर्थपूर्ण कलश लिहितात.-

**अचिन्त्यशक्तिः स्वयमेव देव-**
**श्चिन्मात्रचिन्तामणिरेष यस्मात्।**
**सर्वार्थसिद्धात्मतया विधत्ते**

**ज्ञानी किमन्यस्य परिग्रहेण ।।१४४।।**

भावार्थ : हा ज्ञानमूर्ती आत्मा स्वतःच अनन्त शक्तीचा धारक देव आहे आणि स्वतःच चैतन्यरूप चिंतामणी असल्याने त्याचे सर्व प्रयोजन सिद्ध आहेत, त्यामुळे त्यास अन्य परिग्रहाच्या (पर वस्तू) सेवनापासून काय साध्य होणार ? अर्थात् काहीच नाही...! असा निश्चयनयाचा उपदेश आहे.

हा श्लोक ज्ञानी जीवाची आत्म-पूर्णता आणि आत्म-पर्याप्तता दर्शवितो, जेथे कोणत्याही पर पदार्थांची (भौतिक किंवा आध्यात्मिक वस्तू) आवश्यकता नसते कारण की ते स्वतःच संपूर्ण (परिपूर्ण) असतात.

येथे आचार्य अमृतचंद्रदेव एकमेव शुद्ध अशा आत्मस्वरूपाच्या अनुभवावर भर देतात. ते सांगतात.- आत्मा हा आपल्या चैतन्य स्वरुपी परिणमनाने परिपूर्ण असून तेथे मोहास कोणतेही स्थान नही. कारण की तो स्वतःच शुद्ध-चिद्-घन स्वरूपी चैतन्याचा पिंड आहे. हीच गोष्ट आचार्य योगेंदुदेव या गाथेत सांगत आहेत.

**( क्रमशः )**

# शिक्षण - जीवन उजळवणारी दीपशिखा

शिक्षण म्हणजे केवळ अक्षर ओळखणं किंवा पुस्तकातील धडे पाठ करणं नव्हे. शिक्षण म्हणजे माणसाला माणूस बनवण्याची प्रक्रिया, जन्मजात आपण सर्वकाही जाणत नसतो, पण जगताना शिकलेल्या गोष्टींमुळे आपण घडतो, विचार करतो, निर्णय घेतो, आणि पुढे जातो. हा मार्ग म्हणजेच शिक्षण.

माणसाचा पहिला शिक्षक म्हणजे आई. तिच्या ममतेतून, संस्कारातून आणि शिकवणीतून जगण्याचे आधारस्तंभ तयार होतात. नंतर शिक्षक, मित्र, समाज, अनुभव सगळेच शिक्षक होऊ लागतात.

शिक्षण आपल्याला केवळ नोकरी किंवा उपजीविका देत नाही, ते आपल्याला विचार देतं शिकलेला माणूस फक्त ज्ञानवान नसतो तो संवेदनशीलही असतो. शिक्षण त्याला समज, संयम आणि विवक देतं. त्यामुळे शिक्षणाने माणसाची ओळख बदलते. उद्या कशाचाही सामना करायचा असेल, निर्णय घ्यायचे असतील, योग्य - अयोग्य ओळखायचे असेल तर शिक्षणाची साथ आवश्यक असते.

आजच्या काळात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान, विज्ञान, सामाजिक बदल हे सगळं समजून घेण्यासाठी शिक्षित होणं महत्त्वाच आहे, पण त्याहूनही अधिक महत्त्वाचं म्हणजे योग्य शिक्षण मिळणं. फक्त पदवी मिळवणं म्हणजे शिक्षण नव्हे तर दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करणं, समाजाच भलं विचारणं आणि स्वतःमध्ये सतत सुधारणं हेच शिक्षणाचे खऱ्या अर्थाने यश आहे.

शिक्षणाची बीजे बालकांच्या मनात योग्य पेरली तर त्यातून समाजासाठी फुलणारी सुंदर उद्याची फुले तयार होतात. शिक्षक हा त्या क्रियेतील मुख्य शिल्पकार असतो. त्यांच्या मार्गदर्शनाने विदयार्थी केवळ परीक्षेतच नव्हे तर आयुष्यातही यशस्वी ठरू शकतो. म्हणजेच शिक्षण म्हणजे केवळ पदवी किंवा प्रमाणपत्र नव्हे, तर सतत चालणारी जीवनयात्रा आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर शिक्षण हीच दिशा दाखवणारी ज्योत बनते. ही दीपशिखा जिथे पेटते तिथे अंधार मागे हटतो आणि उज्वल भविष्याचे दार उघडते.

**सौ. स्वप्नाली प्रवीण पाटील,**
बालविकास मंदिर, बाहुबली

**वर्गणीदारांना विनंती...**
**कृपया वार्षिक व आजीवन वर्गणीदारांनी आपली वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे..**

# पट्टमहादेवी–शब्दांपलिकडील अन्वयार्थ
## लेखांक (२६)

**–विपुल खेडकर,** नागपूर मोबा.८८८८८५४४३४

पट्टमहादेवींच्या अकस्मात आगमनाचे यादवपुरीत काय पडसाद उमटतात...? जैन– वैष्णव यांच्यातील दूरी कमी होते....की वाढते....? वाचू या भागात !

**अचूक निदान – चिघळण्यापूर्वीच मलमपट्टी**

ठरल्याप्रमाणे पट्टमहादेवींनी यादवपुरीकडे प्रस्थान केले. कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय अचानक पट्टमहादेवींचे राजमहालात दाखल होणे, हे राणी लक्ष्मीदेवींना अचंब्यात पाडणारे ठरले. तरीदेखील चेहऱ्यावर सहज भाव ठेवीत त्यांनी म्हटले,

‘ पूर्वकल्पना असती तर यथोचित स्वागत केले असते....’

‘असू द्या! विशेष प्रसंगी विशेष व्यवस्था असावी. यादव पुरीबद्दल विशेष स्नेह असल्याने या भागात आल्यावर येथे आल्याशिवाय मन मानत नाही.’ पट्टमहादेवी म्हणाल्या.

‘ ते तर आहेच ! परंतु तरीदेखील पट्टमहादेवींच्या आगमनाचे काही कारण असेलच ना ?’ राणी लक्ष्मीदेवींची जिज्ञासा त्यांना गप्प बसू देत नव्हती.

‘ आचार्यांचे शिष्य उत्तरेकडून यदुगिरीला वापस आल्याची बातमी आली; आचार्यांचा काही संदेश आहे का, त्यांची ख्याली खुशाली जाणून घेण्यासाठी आम्ही आलो होतो..’

‘ मी इतक्या जवळ असून मला ही बातमी माहित नाही........!’

‘ कां ? तुम्हाला तुमच्या वडिलांनी सांगितले नाही का ?’

‘ कदाचित त्यांनासुद्धा माहित नसेल......!’

‘ सचिव नागिदेवण्णा त्यांना सांगूनच यदुगिरीला आले होते.’

‘तर मग मला सांगायलाच हवे होते. कदाचित विसरले असतील....अशात त्यांचा विसरभोळेपणा वाढला आहे....!’

‘ शक्य आहे ! बिच्चारे वृद्धावस्थेला पोहोचत आले ! उद्या सकाळी सचिव नागिदेवण्णांनी बैठक ठेवली आहे. आचार्यश्री एखाद्या महिन्यात पोहोचतील. त्यांच्या आगमन प्रसंगीच्या तयारीसाठी चर्चा करायची आहे...’

‘ हे काम तर मी आणि सचिव मिळून करू शकत होतो, आपणास एवढे कष्ट घेण्याची जरूरी नव्हती..’

‘ तुम्ही स्वतः हजर राहून निर्णय घेतले तर ठीक ! परंतु तुमच्या पाठीमागे निर्णय होऊन, तुमच्या नावाने खपविले गेलेत, तर तो तुमच्या नावाला कलंक आहे! तुम्ही आता होयसळांच्या राणी आहात. सन्निधान सध्या युद्धक्षेत्रात आहेत म्हणून आम्हाला स्वतः यावे लागले. रात्र बरीच झाली आहे. आम्ही विश्रांती घेतो. सकाळी तयार राहावे ! दोघी सोबतच सभेसाठी जाऊ !’

रात्रभर राणी लक्ष्मीदेवीच्या मनात पट्टमहादेवींचे बोलणे घुमत होते.....नेमके काय झाले असेल ? सकाळी नित्यकर्म, देवदर्शन पूजा आटोपून पट्टमहादेवी तयार होत्या. दोघीही सोबतच सभेसाठी दाखल झाल्या. अचानक पट्टमहादेवींना बघून सभेस उपस्थित असलेले सर्वच चपापले. धर्मदर्शी तिरुवरंगदास म्हणजेच राणी लक्ष्मीदेवीचे वडील तर विशेषच! त्यांनी दण्डनाथ शंकरकडे बघितले, त्यांच्याही चेहऱ्यावरचे पाणी पळाले होते.

प्रथेप्रमाणे सभेची सुरुवात णमोकार मंत्र पठणाने करून सचिव नागिदेवण्णांनी भूमिका विशद केली. त्यानंतर शंकर दण्डनाथ बोलण्यासाठी उठले, ‘खरे म्हणजे हे माझे विचार नाहीत तर छोट्या

राणींच्या सल्ल्याप्रमाणे.........'
' मी आपणास कोणता सल्ला दिला?' छोट्या राणींनी मध्येच विचारले .
' छोट्या राणींची एक तीव्र अभिलाषा आहे. ती पूर्ण व्हावी म्हणून मी राजधानीत एक पत्र पाठविले होते.'
' कोणाला पाठविले पत्र ?' पट्टमहादेवींनी विचारले.
' वित्त सचिव मादिराजजींना !'
' काय लिहिले होते पत्रात ?'
' नुकतेच वेलापुरीत निर्माण झालेल्या चेन्नकेशव मंदिरच्या धर्तीवर एक छोटे सुंदर मंदिर येथे यादवपुरीत निर्माण करण्यासाठी धनाची मागणी केली होती.... पण त्याचे काही अजून उत्तर आले नाही किंवा मागणीची पूर्तताही झाली नाही. म्हणून आता आपणा समक्ष विनंती करतो......'
' राणींचा सल्ला आपण घेतला नाही, असे त्या म्हणत असतांना त्यांच्या नावाने आपण पत्र पाठविले?'
' धर्मदर्शी तिरुवरंगदासांनी सांगितले की, राणींची अशी इच्छा आहे... राजधानीला तसे पत्र पाठवा... म्हणून मी धनाची मागणी करण्यास पत्र पाठवले !'
'आपल्या राज्याच्या नियमानुसार पत्रात राजघराण्यातील कोणाचेही नाव येत असेल तर त्यांची संमती घेणे आवश्यक आहे की नाही ? तुम्ही दण्डनाथ आहात ना ? हा नियम माहीत आहे की नाही ?'
' माहीत आहे.......!'
' पत्र लिहिण्यापूर्वी शहानिशा केला का?'
' त्यांच्या वडिलांनी सांगितले म्हणून मी विश्वास ठेवला आणि मुख्य म्हणजे कोणते वाईट तर काम नव्हते ना....!'
' आपण दण्डनाथ आहात ना ?'
' होय...'
' होयसळांचे दुहेरी युद्ध सुरू असल्याचे आपणास माहिती असेलच!'
' हो, माहीत आहे...'
' अशा परिस्थितीत राज्याच्या खजिन्यावर किती ताण असतो, हे देखील आपणास माहीत असतांना ही गोष्ट आपण त्यांना का समजावून सांगितली नाही?'
' मी एक सामान्य अधिकारी! राणीजींच्या इच्छेत बाधा येऊ नये, म्हणून मी बोललो नाही....'
' जर यादवपुरीच्या तिजोरीत पुरेसा पैसा असता आणि तुम्ही त्याचे जबाबदार असता तर, कोणताही मागचा पुढचा विचार न करता राणींच्या इच्छेनुसार तिजोरी मोकळी केली असती! हो ना ?'
' हो ! कदाचित केली असती...!' शंकर दण्डनाथ चाचरतच बोलले.
' ठीक आहे. राणीजींची काय इच्छा आहे ?'
राणी लक्ष्मीदेवींना काय बोलावे हे सुचण्याआधी त्यांचे वडील म्हणाले,
' माझ्या मुलीची इच्छा मी समजू शकतो, म्हणून मीच दण्डनाथांना पत्र लिहायला सांगितले.'
' आपण त्यांची स्वीकृती घेतली होती ?'
' त्या आमच्या मानस कन्या आहेत.'
' परंतु आता त्या होयसळांच्या पत्नी आहेत. होयसळ राणींच्या स्वाधिकारांच्या अंतर्गत विषयात कोणाचीही ढवळाढवळ चालत नाही. त्यांच्या नावाने केले जाणारे प्रत्येक कार्य त्यांची जबाबदारी असते. ते त्यांना स्पष्ट माहीत असणे आवश्यक असते!'
' काही अन्यायपूर्ण सल्लामसलत नसल्याने आम्ही आमच्या लेकी आणि जावयाच्या नावाचा उपयोग केला.'
' आचार्यांचे शिष्य एम्बार परतल्याची बातमी आपण लेकीला दिली नाही...ती देखील हितासाठीच का?'
' एक साधारण, सामान्य शिष्य वापस येणे याला कितीसं महत्त्व आहे ?'
' राजधानीत मंदिर प्रतिष्ठेवेळी वैष्णवांना गोळा करून अडथळा आणण्याचा प्रयत्न केला तो देखील लेक-जावयाच्या कल्याणासाठीच ना ?'
'मला राजनीती कळत नाही. शत्रूंचे हेर टिळा लावून आले...म्हणून मी फसलो.' आवाजात किंचित् संकोच आणत तिरुवरंगदास म्हणाले.
' राजनीतिक प्रज्ञा आपणात नाही, हे याचे कारण नाही. आपण राजांचे श्वसुर असण्याचे सर्वांना सर्वत्र

जाणवून देऊन आपली कामे करता, हे मूळ कारण आहे. हे होयसळ राज्य आहे, आपणास येथील नियमांनुसार वागायला हवे. येथे असणाऱ्या सचिवांना आणि राणींना इथल्या प्रत्येक घडामोडीची माहिती असावी. येथील दण्डनाथांना त्यांच्या वडिलांच्या अनेक वर्षांच्या प्रामाणिक सेवेमुळे आणि विश्वासामुळे हे पद मिळाले आहे. त्याचा दुरुपयोग झाला तर, पदावरून दूर करण्यात सन्निधानांना क्षणभराचा विलंब लागणार नाही; हे आपणासारख्या वयस्कर लोकांना समजायला हवे. धर्मांधता कधीच लोकांमधे एकता निर्माण करू शकत नाही. माथ्यावर टिळा लावून कोणी धार्मिक बनत नाही. असे पुन्हा व्हायला नको! दण्डनाथजी, आपण देखील विवेकाने काम करा....प्रत्येक गोष्ट सचिवांच्या सल्लामसलतीने करा... आपले घराणे होयसळांच्या विश्वासातील आहे. त्यावर कलंक लागेल अशी वर्तणूक घडू देऊ नका! होयसळ राज्यात सर्वधर्मांना समान गौरव मिळतो, कोणताही पक्षपात होत नाही, ही गोष्ट सगळ्यांनी लक्षात ठेवा.'

'आमच्याकडून चूक झाली. आम्ही येथे असतांना राजधानीत असे पत्र जायलाच नको होते. आमची चूक आम्हास मान्य आहे.' सचिव नागिदेवण्णा म्हणाले.

' वेळीच सगळे लक्षात आले, म्हणून आम्ही स्वतः येथे येण्याचे केले! परंतु पुन्हा असे घडायला नको. सगळेच सावध रहा. धर्मदर्शीजी, आपण माझ्या बोलण्याला अन्यथा घेऊ नका. परंतु आचार्य शिष्य एम्बारच्या बाबतीत आपण आता जे बोललात, ते आपणास योग्य वाटते कां? कदाचित सचिव, दण्डनाथांच्या माघारी त्यांच्याबद्दल देखील असेच काही बोलाल...! मी तर तुमच्या प्रगतीच्या मार्गातला मोठा अडथळा आहे असे सर्वत्र बोलत असल्याचे माझ्यापर्यंत पोहोचले आहे..! आणखीही बरेच काही.....! मी देखील तुमच्या वाक्प्रहारातून सुटले नाही, तर बाकी काय? येथे घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे शब्द न् शब्द विवरण सन्निधानांपर्यंत पोहोचते. त्यामुळे आपण सावध व्हा, वागण्यात सुधारणा घडवा! आपल्या वाणीवर आणि कृतींवर संयम ठेवा. राणी लक्ष्मीदेवींना देखील खरेखोटे कळालेच आहे, त्यामुळे यापुढे त्यादेखील सतर्क राहतीलच. आता ही सभा विसर्जित करण्यात येते आहे.'

**नळी फुंकली सोनारे........**

अपमानित होऊन मार्गस्थ झालेले धर्मदर्शी मनात विचार करीत होते, 'एकांतात या गोष्टी सांगितल्या असत्या तर पट्टमहादेवींचे काय बिघडले असते? मी देखील अनेक घाटांचे पाणी प्यायले आहे! आचार्य येथे पोहोचण्यापूर्वीच मी त्यांना भेटून सर्व सांगणार आहे. राजा वैष्णवधर्मीय असतांना एका वैष्णव मंदिर निर्मितीला धन नाही म्हणून सांगणारी ही सर्वधर्म समभावाचे ढोंग करणारी जैन राणी ! होयसळ राज्यातून जैनांचे निर्मूलन करण्याचे स्वप्न घेऊन आलेले आचार्य आणि त्यांना होयसळ राज्यात सुरक्षित आणणारा मी ! मी होतो म्हणून आचार्यांचे डोळे वाचले...! कारण चोल राजाने तर शिवाचे दर्शन न घेणाऱ्यांचे डोळे फोडण्याचा आदेश दिला होता. दिवसभर मंदिरांमधे लपून रात्री रात्री प्रवास करून, बायका मुलांना तेथेच सोडून आचार्य देशोधडीला लागले. येथे आल्यावर या होयसळ राजावर जाळे अचूक फेकले गेले...! राजा तर कब्जात आला...पण ही......ही पट्टमहादेवी रूपी मार्गातली धोंड दूर करणे कठीण आहे.. तरीसुद्धा या अपमानाचा बदला मी घेतल्याशिवाय राहणार नाही...! हे राज्य वैष्णव राज्य बनवूनच राहीन!!'

पट्टमहादेवींनी योग्य मार्गाने प्रश्न हाताळून राणी लक्ष्मीबाईंना, इतर सर्व अधिकाऱ्यांना योग्य मार्गावर चालण्याचा पाठ दिला. रात्री दोघींनी बराच वेळपर्यंत गप्पा केल्या. पट्टमहादेवींनी होयसळ राजघराण्याच्या परंपरा, चालीरीती, इतिहास, पराक्रम समजावून सांगितले. राणी लक्ष्मीदेवी देखील भारावून ऐकत होत्या. आपल्या वडिलांचा दुटप्पीपणा त्यांच्या लक्षात येत होता. दुसऱ्याच

दिवशी पट्टमहादेवी राजधानीकडे रवाना झाल्या.

**वीर परतती घरा, शोधे शांतीचा आसरा**

युद्धाने आक्रमक वळण घेतले होते. विजय दृष्टिपथात आला होता. दोन नवे प्रदेश पूर्णपणे हातात आले होते. तेथील संपत्तीच्या गाड्या भरून भरून राजधानीकडे पोहोचल्या होत्या. त्यांची नोंदणी करून योग्य जागी ठेवणे सुरु होते. अद्यापि दोन ठिकाणे सर व्हायची असल्याने महाराजांना राजधानीत पोहोचावयास अवकाश होता. त्यामुळे वातावरणात थोडा आळस आला होता. अचानक एक दिवस सन्निधान दुसऱ्याच दिवशी राजधानीत परत येत असण्याची बातमी आली. साऱ्यांच्याच कामांना गती प्राप्त झाली! वीर योद्ध्यांचे यथोचित स्वागत, सभा आदि आटोपून सन्निधान रात्रीला पट्टमहादेवींच्या शयनगृहात पोहोचले.

स्वतःहून सन्निधानांना यादवपुरीची वार्ता सांगण्याचे धैर्य पट्टमहादेवींना होत नव्हते. परंतु सन्निधानांनीच विषय काढला... त्यावर विस्तारपूर्वक चर्चा झाली.

शांतलादेवी म्हणाल्या, 'त्या तिरुवरंग-दासांबद्दल मला द्वेष नाही. मात्र त्यांची कामे तोडफफोड करण्यात सहाय्यक आहेत, हे माझे स्पष्ट मत आहे. आता आपला जवळचा संबंध असला तरी खूप सतर्क राहून व्यवहार करावा लागेल.'

' कोणा एका व्यक्तीला घाबरण्याची आम्हाला आवश्यकता नाही...' सन्निधान म्हणाले.

' येथे मतांतराची गोष्ट निहित आहे. सन्निधानांनी त्या मताचे अवलंबन केले...यामुळे मुद्दाम चेतवून तोडफफोड करणे खूप सहज झाले आहे. म्हणून सन्निधानांनी एकवेळ स्वतः जाऊन परिस्थिती बघावी...तेथे जैन धर्म आणि जैन धर्मावलंबी यांचे जीवन धोक्यात आले आहे....'

' आपण योग्य वेळी योग्य निर्णय करून नीट घडी बसवलीत ! आता आम्हास येथेच तुमच्यासोबत शांततेने राहायचे आहे. छोट्या राणींचे सततचे मत्सरी टोमणे नकोत! आपण म्हणत होता ते खरेच होते... धर्मबदलाचा एवढा दूरगामी परिणाम आम्हाला अपेक्षित नव्हता! आता आम्हाला पश्चात्ताप होतोय.. आम्ही वाहवलो होतो, तरी या चौथ्या विवाहास आपण परवानगी कां दिलीत? जीवनातली सर्व शांतीच निघून गेली आहे....!'

' कालच्या निर्णयांवर आज पश्चात्ताप करून काय उपयोग ? जे घडतंय्, त्याला कणखरपणे सामोरे जाणे, हेच आपल्या हातात आहे. धाकट्या राणी आपली वाट बघताहेत... तेव्हा लवकरच यादवपुरीचा मुहुर्त ठरवावा.'

' आपण देखील सोबत चला ना !'

' राजधानीत विजयोत्सव आणि आचार्यांचे स्वागत करायचे, तर तयारी नको का ? आपण जावे, धाकट्या राणींचे सान्निध्यसुख घ्यावे...सोबत राजलदेवींना सुद्धा घेऊन जावे. बम्मलदेवी नुकत्याच युद्धक्षेत्रातून परतल्या आहेत. त्यांना आमच्या सोबत येथेच राहू द्यावे.'

' आपणास आम्ही नकोसे झालो आहोत कां? आम्ही येताच आम्हास दुसरा मार्ग दाखविता... आपण देखील आमच्या धर्मपत्नीच आहात ना ?'

' यात सन्निधानांना शंका कां यावी?' हसून शांतलादेवी म्हणाल्या.

' तुमच्याशी वार्तालापाने सुद्धा जी शांती, जो आनंद मिळतो, तो बाकी कोठेच नसतो. त्यामुळे शक्य तितका वेळ आपल्यासोबत रहावे असे वाटते; तर तुम्ही येथे जा, तेथे जा करीत असता...!' महाराज कृतककोपाने बोलले.

' असे नाही, पण वर्षवर्ष आपण युद्धक्षेत्री असता, धाकट्या राणींचे वय लहान आहे. त्यांच्या अपेक्षा असतात...त्यांना देखील काही बोलायचे असते.. म्हणून मी आग्रह केला एवढेच !' किंचित् हसत शांतलादेवी म्हणाल्या. 'ठीक आहे, जशी आपली मर्जी !'

आणखी बराच वेळ विविध विषयांवर बोलून महाराज त्यांच्या शयनकक्षात गेले. दोनच दिवसांनी यादवपुरीकडे प्रस्थान ठरले, तर अचानक पट्टमहादेवींना आठवले की, जुनी राजधानी

दोरसमुद्रहून एक मोठे व्यापारी केतमल्ल आले होते. त्यांना तेथे विशाल मंदिर निर्माण करायचे होते, त्यासाठी जागा आणि परवानगी हवी होती.आता दोरसमुद्रहूनच जाणार तर, त्यांची भेट घ्यावी म्हणून त्यांनी सन्निधानांना सांगितले. स्वतः दोरसमुद्र पर्यंत सोबत जाऊन पूर्ण आराखडा समजून घेऊन दोघांनी मंदिर निर्माणास स्वीकृती दिली. अर्थातच पट्टमहादेवींच्या निर्देशनातच हे शिवालय उभारण्यात येणार होते, मात्र धनभाराची जबाबदारी सेठ केतमल्ल आणि त्यांच्या दोन पुत्रांनी स्वीकारली होती. यानंतर महाराज यादवपुरीकडे गेले, तर शांतलादेवी वेलूपुरीकडे परतल्या.

लोक येत होते, भेटत होते, शहरातून फेरफटका होत होता. शहरात होणारे मुख्य मुख्य बदल लक्षात येत होते. वातावरणात एकप्रकारचा ताण जाणवत होता. राजमहालातही नोकर-चाकर बदलले होते. तिरकस आणि मनाला लागेल असे बोलणाऱ्या धाकट्या राणींना सगळे टरकून असल्याचे जाणवत होते. हळूहळू बातम्या धडकू लागल्या. आचार्यजींच्या जीवाला जैनांकडून धोका आहे... आचार्यजी यदुपुरीला सर्वधर्म परिषद घेऊन त्यात जैनांना अपमानित करणार आहेत.

सन्निधानांच्या लक्षात आले, पट्टमहादेवींनी येथे येण्याचा आग्रह का केला? अशा बातम्या पसरविण्यामागे कोणाचा हात आहे, धर्माच्या नावाखाली राज्याच्या शक्तीचे स्खलन करण्यात कोणाला स्वारस्य आहे, त्यांना शोधून काढायचे, त्यांना देशद्रोहाची शिक्षा द्यायची... त्यांनी ठरविले.

अशातच आचार्य पोहोचले. सन्निधानांचे आणि त्यांचे एकांतात बोलणे झाले. धर्मदर्शी तिरुवरंगदासांसोबत आचार्य फारसे बोललेच नाहीत. विजयोत्सव आणि चेन्नकेशव मंदिराच्या दर्शनास ते वेलापुरीत पोहोचले. रस्त्यातच दोरसमुद्र पडत होते. नवीन मंदिराचे भूमीपूजन आणि शंकूस्थापना आचार्यांच्या हस्ते व्हावी, असा आग्रह सन्निधानांनी धरला. वैष्णव धर्मगुरु आणि शिवमंदिराची स्थापना...? धाकट्या राणींचा संताप अनावर झाला! वैष्णव राजाचे धन शिवालय निर्मितीकडे खर्च होणार, म्हणून तर चिडचिड आणखीच वाढली. मात्र आचार्यांनी गोड बोलून, दुसरे काम आहे असे सांगून तेथून काढता पाय घेतला. सन्निधानांशी कोणताही कटुपणा न घेता ते मंदिराच्या भूमीपूजन सोहळ्यातून बाहेर पडले... अर्थातच स्वतःचा कट्टरपणा जपला! तर सन्निधानांनी मंदिराची शंकूस्थापना पट्टमहादेवींना सोबत घेऊन केली. होयसळ राज्यात धर्मांमधे भेद केला जात नाही, हे आपल्या कृतीतून दाखवून दिले. राणी लक्ष्मीदेवींना जणू ही चपराकच होती!

आता धर्मांधता प्रकरण महाराजांनी हाताळायचे ठरविले. त्यांनी त्यासाठी आपले हेरखाते नियुक्त केले.

यातून पुढे काय काय बाहेर पडते.. ? हे प्रकरण कसे वळण घेते...? बघू या पुढील भागात...!

**( क्रमशः )**

---

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनमध्ये घवघवीत यश

१) बाहुबलीच्या प्रशाळेने उच्च प्राथमिक लहान गटातून द्वितीय क्रमांक मिळविला, त्याची **जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड** झाली. तसेच प्राथमिक शिक्षकगटात सौ. वैशाली लड्डे यांच्या उपकरणास तृतीय क्रमांक व दिव्यांग गटामधून संस्कार चौगुले याच्या उपकरणास द्वितीय क्रमांक मिळाला.

२) जनतारा शैक्षिणिक संकुलाने उच्च प्राथमिक गटामध्ये प्रथम क्रमांक आणि माध्यमिक-उच्च माध्यमिक गटामध्ये द्वितीय क्रमांक पटकाविले. या **दोन्ही गटामधील उपकरणांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड** झाली. तसेच दिव्यांग विद्यार्थी गट व प्रयोगशाळा परिचर गट या दोन्ही गटामध्ये द्वितीय क्रमांक मिळविला.

# ‘सोलहकारण भावना भाय....!’

(लेखांक १२)

**हर्षा वेखंडे, नागपूर,९८२२६९०८६०**

**बहुश्रुत भक्ती भावना...**

**(भाग एक)**

‘बहुश्रुत भक्ती भावना ही सोलहकारण भावनेतील बारावी भावना आहे. अरहंत भगवंतांच्या प्रति भक्तीचा भाव उचंबळून आलेला भव्य जीव धर्माला आचार्यांच्या आचरणात शोधतो. परंतु आचार्य परमेष्ठी बोलतीलच, धर्म समजावून सांगतीलच हे काही आवश्यक नाही. असं होऊ शकतं की, ते त्यांच्या चर्येत मग्न राहतील! केवळ त्यांच्या आचरणातून मोक्षमार्ग जाणणं कदाचित अवघड जाऊ शकतं. अशा वेळेस धर्म समजून घेण्यासाठी त्याला एकच आधार दिसतो, तो म्हणजे ज्ञानदान करणारे उपाध्याय परमेष्ठी. बहुश्रुतभक्ती भावना ही उत्कृष्ट रूपात उपाध्याय परमेष्ठींची भक्ती आहे.....’ - संध्याकाळच्या पाठशाळेत आजी बहुश्रुत भक्ती भावना समजावून सांगत होत्या.

‘आजी, अरहंत भगवंतांच्या भक्तीनंतर आचार्य परमेष्ठींची भक्ती आणि त्यानंतर आता उपाध्याय परमेष्ठींची भक्ती... असं वाटतंय् णमोकार मंत्राचा जप सुरू आहे... फक्त सिद्ध भगवंतांना आणि साधूंना मौन वंदन केलं गेलं...’

संवेगच्या शब्दांनी आजींच्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमटलं. आजी म्हणाल्या, ‘संवेग, ज्याला णमोकार मंत्र समजला, तो धर्मोन्मुख झाला... ‘बहुश्रुत’ या शब्दाचा अर्थच सखोल आहे बघ!.. श्रुत म्हणजे ऐकलं गेलं ते...

महावीर भगवंतांना केवलज्ञान झालं... त्यांनी विश्वाला जाणलं... भगवंतांची वाणी खिरली.. ती ऐकली गेली. मनुष्य-तिर्यंच-देव सारे जमले समवशरणात! प्रत्येकाला आपापल्या योग्यतेनुसार कळली, पण गौतम गणधर आचार्यांना पुरेपूर समजली... त्यांच्याद्वारे शास्त्र रचना झाली....बारा अंगांमध्ये ती रचली गेली....ती द्वादशांग वाणी म्हणजे श्रुत! त्या द्वादशांग वाणीचं संपूर्ण ज्ञान ज्यांना असतं, ते आहेत श्रुतकेवली. ते असतात बहुश्रुतज्ञानी. ‘बहुश्रुत’ म्हणजे जे द्वादशांग वाणीत पारंगत आहेत! भगवंतांचं ज्ञान केवलज्ञान, संपूर्ण विश्वाला जाणणारं प्रत्यक्ष ज्ञान. श्रुतकेवलींना केवलज्ञान तर नाही, आपल्यासारखेच मन आणि इंद्रियांनी जाणणारे आहेत ते, पण श्रुतकेवली श्रुतज्ञानाने केवलज्ञानाला जाणतात. अर्थात वस्तु व्यवस्थेला जाणतात. उपाध्याय पदावर विराजमान आहेत ते! जिनभगवंतांनी जे धर्माचं स्वरूप सांगितलं, ते आम्हा जिज्ञासूंपर्यंत पोहोचवणारी अमूल्य कडी म्हणजे उपाध्याय परमेष्ठी! बहुश्रुतभक्ती ही उपाध्याय परमेष्ठीची भक्ती आहे. जे अंगपूर्वांचे ज्ञानी आहेत, चारही अनुयोगांत जे पारगामी आहेत, स्वतः आगमाच्या अध्ययनात मग्न राहतात आणि अन्य शिष्यांनाही शिकवतात, ते बहुश्रुत ज्ञानी होय.

उत्कृष्ट रूपाने श्रुतकेवली हे उपाध्याय आहेत. गौणरूपाने ज्यांना जिनवाणीचं सम्यग्ज्ञान आहे, जे सदैव ज्ञानार्जनात मग्न राहतात, सोबतच शिष्यांना साधर्मी श्रावकांना ज्ञानदान देतात, अध्ययन करवतात, असे मुनिराज उपाध्याय होत.

शास्त्र-अभ्यासाशिवाय, आगमाच्या ज्ञानाशिवाय आत्मज्ञान नाही. आत्मज्ञानाशिवाय आत्मस्वरूपाचे श्रद्धान नाही. सम्यक् श्रद्धानावाचून मोक्षमार्ग नाही.... त्याशिवाय संसारातून सुटका नाही.. त्यामुळे ज्ञानदान देणारे उपाध्याय परमेष्ठी श्रावकाच्या हृदयस्थानावर विराजमान असणारे देव होत, जे आत्मदेवाशी गाठ घालून देतात. किती अहोभाव यावा त्यांच्या प्रति.. हा इतका उच्च भक्तीचा भाव जीवाला सर्वोत्कृष्ट पुण्य प्रकृतीचा म्हणजे तीर्थंकर नाम कर्माचा बंध करणारा आहे.

श्री छहढाला या शास्त्रात दौलतरामजी म्हणतात,
**ज्ञान समान न आन जगत में सुख को कारन।**
**इह परमामृत जन्मजरा– मृति– रोग निवारन।।**
ज्ञानाशिवाय तरणोपाय नाही !
ज्ञानीशिवायही तरणोपाय नाही!
स्वाध्याय करावा लागणार..!

समजावून सांगायला सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र्य धारण करणारे बहुश्रुत ज्ञानी आवश्यक आहेत. ज्यांना धर्माचं स्वरूप समजलं आणि ते त्यांनी आचरणतून प्रगट केलं.. तेच सांगणार ना समजावून! म्हणूनच त्यांची भक्ती ही सर्वोत्कृष्ट पुण्यबंधाचं अर्थात तीर्थंकर नामकर्माच्या बंधाचं कारण बनते.'

'आजी, नेमका 'स्वाध्याय' कशाला ग म्हणायचं ?' संवेग म्हणाला.

आजी उत्तरल्या, 'संवेग, द्वादशांग वाणी स्वाध्याय आहे. त्यातूनच अज्ञानीला स्वतःचं स्वरूप समजतं...

जिनवाणीचे बारा अंग म्हणजे वास्तवात जीवाचं, जीवा संबंधीचं, खरं तर विश्वातील साऱ्या पदार्थांचं सारासार वर्णन आहे. त्याच्या अध्ययनातूनच आम्हाला स्वतःचं स्वरूप कळतं... अर्थात स्वतःचा अध्याय उघडला जातो, स्वाध्याय होतो.

जिनवाणी पूजनात जिनवाणीचे अकरा अंग आणि चौदा पूर्वांचं वर्णन येतं, ते वाचून ऐकून शब्दागमाची अर्थात द्रव्यश्रुताचा महिमा येतो.

जिनवाणीचे बारा अंग सांगते हो समजावून... लक्षपूर्वक ऐका..!

**१) आचारांग–** द्वादश म्हणजे बारा अंगांमधील प्रथम अंग आचारांग आहे. आचार म्हणजे आचरण, वर्तन. परमागमाचे अध्ययन हे मोक्षाला निमित्त आहे. त्या कारणाने मोक्षाचे अभिलाषी या ग्रंथांचा अत्यंत आदर करतात. मोक्षाला कारण आहे सकल चारित्र अर्थात मुनींचे चारित्र. म्हणून सर्वप्रथम मुनिचर्येचं कथन या आचारांगामध्ये केलं गेलं आहे. ज्याने मोक्ष साधला जातो, त्या मोक्षमार्ग स्थित साधूंचं चालणं, बोलणं, उभं राहणं, झोपणं, खाणं-पिणं कसं असावं, जेणेकरून पापकर्मांचा बंध होणार नाही.....अशाप्रकारे मुनींचीं व्रतं, समिती, तप, धर्म यांचं वर्णन आचारांगामध्ये केलं आहे. आचारांग म्हणजे जणू मुनींची आचारसंहिता आहे, जी श्रावकांनाही मार्गदर्शक व बोधप्रद ठरते. आचारांगाचे १८००० पद आहेत.'

'अरे वा...जे मोक्षाला जवळचं आहे, ते म्हणजे मुनी आचरण. त्यामुळे त्याचं वर्णन द्वादशांग वाणीत सर्वप्रथम केलं गेलं... किती लॉजिकल आहे हे!' संवेग म्हणाला.

**२) सूत्रकृतांग–** सूत्रांद्वारे अर्थात संक्षेपात सूचित करणारा हा परमागमाचा अध्याय आहे. यात जिनेन्द्र भगवंतांच्या श्रुताची आराधना करण्याच्या विनयक्रियांच्या संबंधी वर्णन आहे, जेणेकरून निर्विघ्न अध्ययन होऊ शकेल.

या अंगात अनेक बाह्यमतांच्या तत्त्वज्ञानाचे वर्णन केले आहे. बाह्य परमतांच्या दोषांचं निरसन करून जैन धर्माची श्रेष्ठता स्पष्ट केली आहे. चुकीच्या साधनेपेक्षा सम्यक् मार्गाने साधना करण्याचे महत्त्व दाखवले आहे. या ग्रंथांमुळे साधकांना विविध बाह्य पंथांच्या तत्त्वज्ञानाची माहिती मिळते आणि खऱ्या मोक्षमार्गाचं श्रद्धान दृढ होतं. सूत्रकृतांगाची पदसंख्या ३६ हजार आहेत.'

'योग्य रस्त्याने पुढे गेलात तरच ध्येयापर्यंत पोहोचाल...त्यामुळे मार्गाचा निर्णय सर्वप्रथम करा हा संदेश देणारं हे दुसरं अंग आहे तर!' संवेगने आपलं मत मांडलं.

'अगदी बरोबर! सर्वप्रथम मार्गाची निवड करणं आवश्यक. आता वळू या तिसऱ्या अंगाकडे..'

**३) स्थानांग–** स्थान या शब्दाचा अर्थ गणना, क्रम किंवा स्थान असा होतो. या ग्रंथांमध्ये जीव-अजीव विषयक सिद्धांत, तत्त्वज्ञान गणनेच्या स्वरूपात (म्हणजे एक स्थान, दोन स्थान, तीन स्थान अशी मांडणी करून) समजावले आहे.

जसे ....

संग्रह नयाने आत्मा एक आहे.
व्यवहार नयाने आत्म्याचे संसारी आणि मुक्त असे दोन भेद आहेत.
लक्षण भेदाने उत्पाद–व्यय–ध्रौव्य या तीन लक्षणांनी संयुक्त आहे.
कर्मांच्या वशीभूत चार गतींमध्ये भ्रमण करतो त्या कारणाने चार गतिवाला आहे....
एक स्थान–संग्रह
दोन स्थान–भेद नय
तीन स्थान–तीन लक्षण
चार स्थान–चार गती ....
अशा पद्धतीने सहा द्रव्यांचं एकाहून एक वाढत जाणाऱ्या स्थानांच्या अपेक्षेने वर्णन केलं आहे.

स्थानांग ग्रंथ म्हणजे जैन तत्त्वज्ञानाची क्रमवारी दाखवणारा नकाशा होय. अशा मांडणी पद्धतीने तत्त्वज्ञान सहजतेने लक्षात येते, म्हणून ही पद्धती अवलंबण्यात आली आहे.'

'आजी, हा तर चार्ट आहे.. लक्षात ठेवायला सोपा.. आमच्या शाळेत अशाच पद्धतीने चार्ट रूपाने शिकवलं जातं.' सक्षम म्हणाला.

'बघा! कथन करण्यामध्येही वैज्ञानिक पद्धती आपल्या तत्त्वज्ञानात कशी अवलंबली आहे...!! या ग्रंथांमध्ये एकूण ४२ हजार पदे आहेत.'

**४) समवायांग–** सं अर्थात समानतेच्या अपेक्षेने अवेयंते अर्थात जीव आदी पदार्थ जाणले जातात ते समवायांग होय. या ग्रंथांमध्ये द्रव्य–क्षेत्र–काल–भावाच्या अपेक्षेने समानता सांगितली जाते. समवायचा अर्थ होतो समूह. समवायांग मध्ये अलग अलग प्रकारचे समूह करून जीवादी पदार्थांचं तुलनात्मक ज्ञान ग्रहण केलं आहे.

जसे द्रव्याच्या अपेक्षेने... जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश, काल ही सगळी द्रव्ये समान आहेत....सारी द्रव्येच आहेत.

अस्तिकायांच्या अपेक्षेने.. जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश समान आहेत... सारे अस्तिकाय आहेत. हा द्रव्य समवाय होय.

क्षेत्राच्या अपेक्षेने अडीच द्वीपरूप मनुष्य क्षेत्र आणि सिद्धशिला ४५ लाख योजन... दोन्ही क्षेत्रांचा विस्तार समान अशा पद्धतीने क्षेत्रसमवाय आहे.

अवसर्पिणी काळ आणि उत्सर्पिणी काळ काळाच्या अपेक्षेने समान लांबीचे आहेत.....दहा कोडाकोडी सागर अवधीचे आहेत. हा काल समवाय होय.

भावाच्या अपेक्षेने केवलज्ञान व केवलदर्शन समान आहे.

अशा रीतीने समानतेच्या अपेक्षेने समवायांग ग्रंथांमध्ये वर्णन केलं आहे. १ लाख ६४ हजार पदांमध्ये हे वर्णन केलेले आहे.

'हो, हो, अगदी बरोबर... आपण सारे जीव समान.. सिद्ध भगवंतांसारखे.. सारे ज्ञायकच., मनुष्याच्या अपेक्षेने सारे मनुष्य सारखेच....! किती सोपं जातं ना असं समजणं...' –सक्षम म्हणालाच.

'अरे, हीच तर जिनवाणी आहे. समजून घेणं किती सोपं आहे बघ....'

**५) व्याख्याप्रज्ञप्ति अंग–** महावीर भगवंतांच्या समवशरणात गौतम स्वामींचा प्रवेश झाला. सम्यक् दर्शन प्राप्त करून, त्यांनी मुनिदीक्षा धारण केली आणि भगवंतांची वाणी खिरली. समवशरणात गौतम स्वामींनी अनेक प्रश्न विचारले, जसे की,
जीव अस्ति आहे की नास्ति आहे?
जीव एक आहे की अनेक आहे ?
जीव नित्य आहे की अनित्य आहे?
मोक्षाची प्रक्रिया काय आहे?
मोक्षाला कोण जातात, कसे जातात ?
इत्यादी साठ हजार प्रश्न गणधरदेवांनी तीर्थंकरांच्या निकट विचारले, त्यांचं वर्णन २ लाख २८ हजार पदांमध्ये या अंगात केलं आहे.'

'किती महत्त्वाचे प्रश्न आहेत ना हे! आपल्याला पण उपस्थित होतात. मनात कितीतरी प्रश्न....असं वाटतं की आपण जन्माला का येतो? मरण का होतं? आपल्याला विशिष्ट आई–वडीलच का मिळतात... कुठून कसं आणि कशा पद्धतीने जीवाचं भ्रमण

चालतं?' – संवेग म्हणाला.

'अगदी बरोबर! अशा सगळ्या प्रश्नांची उत्तरं देणारा जिनवाणीचा पुढचा अध्याय आहे बरं का..

**६) नाथधर्मकथा किंवा ज्ञातृधर्मकथा अंग–**

नाथ म्हणजे तीन लोकांचे स्वामी तीर्थंकर. त्यांच्या धर्मकथा ज्यात आहेत ते नाथधर्मकथा नावाचं सहावं अंग आहे. घातिकर्मांच्या नाशाने कसं केवलज्ञान प्रकट होतं, तीर्थंकर नाम कर्माच्या उदयाने अतिशय प्रगट होतात, त्या तीर्थंकर भगवंतांची सकाळ, मध्यान्ह, संध्याकाळ, मध्यरात्री, सहा–सहा घडीपर्यंत बारा सभांमध्ये दिव्यध्वनी होते, त्या दिव्यध्वनीत श्रोत्यांना दशधर्म, रत्नत्रय धर्मांचं कथन केलं जातं, हे सारे वर्णन या अंगात आहे.

ज्ञाता म्हणजे गणधर देव. त्यांना ज्या प्रश्नांची उत्तरं जाणण्याची इच्छा होती, त्या प्रश्नांच्या उत्तर रूपाने ज्या धर्मकथा सांगितल्या गेल्या त्यांना ज्ञातृधर्मकथा म्हणतात. अस्ति–नास्ति इत्यादी प्रश्न गणधरांनी केले त्यांची उत्तरं या अंगामध्ये सांगितली गेली आहेत. तसेच तीर्थंकर–गणधर–इंद्र–चक्रवर्ती यांच्या धर्म संबंधित कथा या अंगात सापडतात, म्हणूनही ज्ञातृधर्मकथा असे या अंगाचे नाव आहे.'

'आजी, एकूण या अंगात तीर्थंकर भगवंतांचा महिमा वर्णन केला आहे.... त्यांच्या मोक्षप्राप्तीच्या प्रवासाचं वर्णन या अंगात आहे तर...गणधरांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं देखील येथे सांगितली आहेत. मला हळूहळू या द्वादशांग वाणीची ओळख होते आहे..' संवेग म्हणाला.

'खूप छान! संवेग, अशाच पद्धतीने जिनवाणी प्रति रुची उत्पन्न होते. यामध्ये वास्तवात जीवाचं वर्णन आहे, म्हणजे आपलंच नाही का?...आपल्याला जो मार्ग अवलंबायचा आहे, त्या मोक्षमार्गाचं वर्णन आहे हे! द्वादशांग वाणीच्या पुढल्या अंगात श्रावकांच्या व्रतांचं वर्णन केलं आहे. बघू या त्याचं स्वरूप!

**७) उपासकाध्ययनांग :–** जिनवाणीच्या या अंगात एकूण ११ लाख ७० हजार पदांमध्ये श्रावकाची व्रतं, शील, आचरण, क्रिया, मंत्र आदींचे विस्ताराने वर्णन केलं आहे.

उपासक कोण असतात?

जे मुनीसंघाला आहारदान देतात, तसेच पूजन आदीने संघाची सेवा करतात, असे जे श्रावक त्यांना उपासक म्हणतात. ते 'अधीयन्ते' अर्थात वाचन करतात ज्या ग्रंथांचे, ते उपासकाध्ययन नावाचे सातवे अंग आहे. गृहस्थांच्या ११ प्रतिमांचं वर्णन या अंगात केलं आहे.'

'आपल्या जिनमती आजी ज्या पद्धतीने विहिरीचं पाणी जीवाणी पोहोचवून, गाळून वापरतात... त्या ज्या व्रतांचं पालन करतात त्या व्रतांचं वर्णन या ग्रंथांमध्ये केलं आहे तर... बरोबर आहे ना माझं?...' संवेग म्हणाला.

आजी म्हणाल्या, 'अगदी बरोबर! संवेग, काही जीवांना मोक्षमार्गावर मार्गक्रमण करत असतांना भयंकर संकटांना तोंड द्यावं लागतं. पुरुषार्थी मुनिराज कुठल्याही उपसर्गांना न घाबरता, किंचितही न डगमगता आत्मसाधनेतून ढळत नाहीत आणि मोक्ष प्राप्त करतात. त्यांच्या कथा पुढल्या अंगात सांगितल्या आहेत बरं का!

**८) अंतःकृत् दशांग :–** एक एका तीर्थंकरांच्या तीर्थकाळात दहा दहा मुनी घोर उपसर्ग सहन करून, पाप कर्मांचा नाश करून संसाराचा अंत करतात, मोक्षाला जातात त्यांना अंतःकृत म्हणतात. त्यांचं कथन ज्या अंगात आहे ते अंतःकृतदशांग नावाचं आठवं अंग होय. आपले चोवीसावे तीर्थंकर वर्धमान स्वामींच्या काळात नमि, मतंग, सोमिल, रामपुत्र, सुदर्शन, यमलीक, वलिक, विकृविल, विष्कंविल व पालंवष्टपुत्र हे दहा अंतःकृतकेवली झालेत. प्रत्येक तीर्थंकरांच्या काळात असे दहा दहा अंतःकृतकेवली होतात. त्यांचे विस्ताराने कथन या आठव्या अंगात केलं आहे. या अंगात एकूण २३ लाख २८ हजार पदं आहेत.

**९) अनुत्तरौपपादिक दशांग –** ज्यांचा उपपाद जन्म होतो त्यांना औपपादिक म्हणतात. जे अनुत्तर विमानांमध्ये अर्थात विजय, वैजयंत, जयंत,

अपराजित, सर्वार्थसिद्धी या विमानांमध्ये देव होऊन उपपाद जन्म घेतात, त्यांना अनुत्तरौपपादिक म्हणतात. एकेका तीर्थंकर भगवंताच्या काळात दहा दहा महामुनी दारुण उपसर्ग सहन करून समाधिमरणासहित प्राणत्याग करतात आणि अनुत्तर विमानांमध्ये उपपाद जन्म घेतात, त्यांच्या कथा ज्या अंगात आहेत, ते हे अनुत्तरौपपादिक दशांग नावाचं जिनवाणीचं नववं अंग आहे.

महावीर भगवंतांच्या काळात ऋजुदास, धन्य, सुनक्षत्र, कार्तिकेय, नंद, नंदन, शालिभद्र, अभय, वारिषेण, चिलातीपुत्र हे दहा झालेत. असेच बाकी तीर्थंकरांच्या काळातही दहा दहा मुनी अनुत्तर विमानांमध्ये जन्म घेते झालेत. त्या सर्वांचं कथन या अंगात आहे. या अंगाची एकूण ९२ लाख ४४ हजार पदं आहेत.'

'आजी, या दोन्ही अंगांचं वर्णन ऐकून माझ्या अंगावर अभिमानाने रोमांच उभे झाले आहेत! त्या थोर मुनिराजांनी उपसर्ग सहन करूनही मोक्षमार्ग सोडला नाही... त्याच्या फळ रूपाने कोणी मोक्षाला गेले, तर कोणी अनुत्तर विमानांमध्ये जन्म घेते झाले. खऱ्या मार्गावर चालण्यासाठी आम्ही कशाला घाबरायचं.. सत्याचा नेहमी विजयच होतो, हो ना!' सक्षम म्हणाला.

'अगदी बरोबर !' आजी उत्तरल्या.

**१०) प्रश्न व्याकरणांग –** प्रश्न विचारणारा पुरुष जे काही प्रश्न विचारू शकतो, त्यांचं वर्णन या अंगात केलं आहे. जसे आपली हरवलेली वस्तू, मुठीत ठेवलेली वस्तू, लाभ, हानी, सुख, दुःख, जीवन, मरण, हार-जीत इत्यादी भूतकाळ, भविष्यकाळ, वर्तमानकाळ संबंधित प्रश्न आणि त्यांची उत्तरं यांचं वर्णन या अंगात केलं आहे.

'हे सारे वर्णन म्हणजे अलिबाबाची गुहाच आहे.. अमाप संपत्तीने भरलेली. साऱ्याच प्रश्नांची उत्तरं म्हणजे जिनवाणी आहे..' मुलांमधून आवाज आला.

'हो बरं... आपण वळावं अध्ययनाकडे' समाधानाने आजी म्हणाल्या.

**११) विपाकसूत्रांग –** विपाक म्हणजे कर्मांचा उदय. कर्मांच्या उदयांना 'सूत्रयति' अर्थात सांगतं ते विपाकसूत्र नावाचं जिनवाणीचं अकरावं अंग जाणावं. त्यात कर्मांचं फळ देणेरूप जे परिणमन आहे, त्याला उदय असे म्हणतात. या अंगात कर्मांचे उदय, उदीरणा, सत्ता यांचं १ करोड ८४ लाख पदांमध्ये वर्णन केलं आहे.

**१२) दृष्टिवाद –** दृष्टिवाद नावाच्या बाराव्या अंगात ज्या कारणाने जीव अनादिकाळापासून संसारात भ्रमण करत आला आहे त्या मिथ्यात्वाला दूर करण्यासंबंधीचं वर्णन आहे.' शारदाआजींचं हे विवेचन मुलं लक्षपूर्वक ऐकत होती.

अचंबित होऊन संवेग म्हणाला, 'किती विस्तृत आणि सखोल आहे हे कथन..ज्ञानाचा सागर जणू! एखाद्या विस्तीर्ण आणि विशालकाय ज्ञानसागरासमोर बसलेला एक छोट्टासा जीव वाटू लागलो आहे मी मला....!'

शारदा आजी हसल्या, म्हणाल्या.. 'संवेग, पण या जीवात शक्ती आहे बरं का, संपूर्ण जिनवाणीचं ज्ञान करण्याची. तुझ्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं या द्वादशांग वाणीत दडलेली आहेत. गरज आहे ती फक्त जिज्ञासा जागृत होण्याची.. आणि त्या जिज्ञासेचा पाठपुरावा करून ज्ञानार्जन करण्याची अर्थात् स्वाध्यायाची! पुढल्या स्वाध्याय वर्गात आपण दृष्टिवाद अंगाचे भेद तसेच प्रकीर्णक आदी काय असतात हे बघणार आहोत.'

मुलांच्या चेहऱ्यावरील उत्साह आणि उत्सुकता त्यांच्या धर्ममय उज्ज्वल भविष्याची जणू ग्वाही देत होता...आणि समाधानाची पावती आजीच्या चेहऱ्यावर उमटत होती.

**( क्रमशः )**

**अध्ययन से उपाधी मिलती है और**
**स्वाध्याय से समाधी मिलती है ।**

**आ. बा.ब्र. रविन्द्र जी आत्मन्,**
**जिनशासन प्रभावना, जबलपूर**

## पुस्तक-परिचय-

गेल्या काही दिवसात **श्रीभद्र संस्कार** हे पुस्तक वाचण्यात आले डॉ. श्री. नेमिनाथ शास्त्री यांनी लिहिलेले आणि डॉ. स्वयंप्रभाताई पाटील यांचेकडून प्रकाशित हे आध्यात्मिक पुस्तक लहान मुलांच्या आध्यात्मिक अभ्यासक्रमातील महत्त्वपूर्ण ठरणार, असा विश्वास हे पुस्तक वाचून निर्माण झाला

परमपूज्य आचार्य समंतभद्र महाराज यांनी बालपणापासून धर्म जोपासला जावा तो वृद्धिंगत व्हावा हा विचार धरूनच जैन गुरुकुलांची शृंखला उभारले लहान मुलावर कोवळ्या वयात केले गेले. धार्मिक संस्कार हे उत्तम श्रावक तर तयार करतातच त्याचबरोबर त्यांच्या लौकिक शिक्षणावर ही दूरगामी प्रभाव टाकतात.

याच तत्त्वांना अनुसरून डॉ. नेमिनाथ शास्त्री यांनी अगदी सहज सोप्या पद्धतीने आपला धर्मतत्त्वे, तीर्थंकर, थोर महापुरुष, आपली जिनवाणी या सर्वांचा मुलांना परिचय करवून देण्याचा हा केलेला प्रयत्न नक्कीच अनुमोदनेस पात्र आहे.

मुलांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन पानांची आकर्षक रंगसंगती, प्रत्येक पाठातील प्रस्तावना, पूर्वज्ञान, त्यांचा अर्थ आणि शेवटी अगदी मनोरंजक असा स्वाध्याय मुलांना पाठाविषयी परिपूर्ण माहिती देतात. स्वाध्यायातील प्रश्न कृतिपत्रिका अगदी सहजपणे मुलांची उजळणी करून देऊन त्यांच्या ज्ञानाचा पाया भक्कम करण्यास मदत करतात.

डॉ. स्वयंप्रभाताई यांचे प्रेरणास्थान त्यांचे वडील श्रावकरत्न स्व. पिरगौडा महादेवगौडा पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांचे व कुंदप्रभा प्रकाशन यांचे हे बारावे पुष्प आहे.

स्वयंप्रभाताई यांनी हाती घेतलेले धार्मिक पुस्तक प्रकाशनाचे हे व्रत वाखाणण्याजोगे आहे. त्यांच्या या कार्यास सर्वांच्या शुभेच्छा व शुभाशीर्वाद नक्कीच प्राप्त होईल आणि या कार्याची व्याप्ती दिवसेंदिवस वृद्धिंगत होईल हा सार्थ विश्वास आहे, ही एक मंगल भावना आहे.

**श्रीमती मंगल चंद्रकांत पाटील,** इनाम धामणी

## सभासदांना विनम्र निवेदन....

सन्मति - मासिकाची अमृतमहोत्सवी वर्षपूर्तीकडे यशस्वी वाटचाल झालेली आहे. परमपूज्य गुरुदेव समंतभद्र महाराजांची प्रेरणा, बाहुबली संस्थेकडून मिळालेले सततचे पाठबळ आणि सर्व वाचक सभासदांकडून मिळालेले आत्मीय सहयोग यामुळे गेल्या ७५ वर्षांपासून धर्म प्रभावनेचा हा सन्मति-प्रवाह वाहता आहे. अनेक अडचणींवर मात करीत आणि प्रसंगी तोटा सहन करून सन्मति मासिक जैन साहित्यात योगदान देत आहे. जानेवारी २०१५ पासून मासिकाची वार्षिक वर्गणी रु. १५०/- आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) १,५००/- रुपये अशाप्रकारे होती. परंतु वाढती महागाई प्रिंटिंग, कागद, डीटीपी व डिझाईन या सर्वच गोष्टींना प्रभावित करीत आहे. त्यामुळे **चालू महिन्यापासून वार्षिक वर्गणी रुपये २५० आणि आजीवन (१५ वर्षाकरिता) रुपये २,५००/-** अशा प्रकारे वाढ करण्यात येत आहे.

आपण सर्वांनी अनेक वर्षांपासून या मासिकास जो सहयोग दिला, त्याबद्दल अनेक धन्यवाद ! या मासिकाला दीर्घजीवी बनवण्यासाठी आणि भविष्यातही ते सुचारू पद्धतीने सुरू राहण्यासाठी मासिकावर प्रेम करणारे सर्व वाचक ही अपरिहार्यता समजून घेतील आणि भविष्यातही असाच सहयोग देतील हा विश्वास वाटतो. तेव्हा सर्व सभासदांना विनंती आहे की आपण सर्वांनी लवकरात लवकर वाढीव वर्गणी पाठवून सहकार्य करावे. **-संपादक मंडळ**

# संवाद हरवलेलं कुटुंब

**शब्दांकन – श्री. महावीर शिरगावे सर, बाहुबली**
**मोबा. नं. ९८२२४५७१०८**

सन्मतीत अक्षरशिल्पांच्या माध्यमातून संवाद साधतो सर्वांना करून जयजिनेन्द्र...!

जिथे दोन चेहरे तंतोतंत जुळतात,

त्यांना बहिण–भाऊ असे म्हणतात.

आणि जिथे चेहरे जुळत नाहीत त्यांना नवरा आणि बायको असे म्हणतात.

विविधतेने नटलेला भारत. सुजलाम सुफलाम भूमी. चंद्रावर यान सोडण्यात आपण यशस्वी झालो.

पुढारलेल्या २१व्या शतकातलं युग तंत्रज्ञानाचं, संगणकाचं, आणि स्क्रीन असलेल्या अँड्रॉइड मोबाईलचं.

आपण चकचकीत पॉलिश्ड लाइफ जगतो. पण प्रत्येकजण वेळच नाही म्हणतो. परंतु सगळ्यांना दिवसाचे २४ तासच असतात.

मोबाईलचा अतिवापर स्वास्थ्य आणि संवाद हरवण्याकडे चाललेला आहे. त्याची प्रचिती आपणा सर्वांना येते. अगदी आपल्या घराच्या चौकटीपर्यंत. म्हणून विचारांचा नंदादीप शब्दांची दीपमाळ घेऊन अक्षरांची तुळस व विचारांचा कळस चढवण्याचा हा माझा प्रयत्न.

एखाद्याशी बोलताना चेहरा होतो आरसा..

फरक पडत नसतो फारसा..

अशाने संवादाला सुरुवात होते. संवादात बोलायलाच पाहिजे असेही नाही.

स्मितहास्यही संवाद होऊ शकतो. चेहऱ्यावरचे भाव बदलू शकतो.

नात्यांमध्ये खारटपणाचे मीठ पडलं की, दूध घालून निवळायचं,

म्हणजेच संवाद घडतो. शब्दापलीकडेही संवाद असतो.

कदाचित तो मूकही असतो, पण प्रभावी.....!

बालकाचा चेहरा सुद्धा दर्शविते भाषा.

त्यात वाद, विवाद व संवाद असतो.

माणसाने धर्म, मर्म, कर्म करत माणुसकीत भिजायला पाहिजे.

पर्यायाने मोबाईलचा वापर कमी करायला पाहिजे. बोलण्यामुळे व्यक्ती उकलते, माणूस कळतो. व्यक्तीचं सौंदर्य ठराविक वयापर्यंतच असतं. आयुष्याला मर्यादा आहेत. त्यातच आपलं जगणं सुखकर करायला पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाबरोबर संवाद साधता आला पाहिजे.

संवाद साधत राहिलं सुद्धा पाहिजे.

माणूस जोडून आपल्याला पूल व्हायचं आहे.

येण्या आधी जाणे निश्चित असतं. मग राग धरून अबोल का ?

राग, अनुराग सोडा.

संवाद साधा.

थरथरता.....

सुरकुतलेला .....

हात हातात धरा.

संवाद साधा.

आनंदाचं उधान येतं.

सुखाची प्रचिती येते.

पण फुकटचं बोलणं आपण का महाग करून ठेवलोय. ?

हेच कळत नाही.

पूर्वी बोल कि लेका,

बोलायला काय पैसे पडतात काय....?

असं म्हणत होतो.

पण आता बोलायलाही पैसेच पडतात. विकतचं बोलतो.

पण फुकटचा संवाद महाग करत चाललोय. घरात

चार जण असले तर चार भिंतीत ऑनलाइन असतात. पण त्यात आपण ऑफलाईन हे विस्तवासारखे वास्तव आहे. वाचताना पानं आडवी पालटत होतो.

आता मोबाईलवर पानं उभी पालटू लागलो आहे.

नव्वद वर्षांच्या माणसाला
पुरी बासुंदीची भूक नाही त्याला स्पर्शाची,
आपुलकीची,
अन आपल्या माणसांची भूक आहे.
केवळ संवाद साधण्यासाठी.
हात हातात,
हात सांजवात,

जेवणातला जणू दहीभात. माणसाच्या पोटातलं ओठावर आणणं म्हणजेच संवाद असतो.

कामावरून आल्यावर कधीतरी बायकोला छान दिसतेस म्हणा. कधीतरी थँक्यू म्हणा.

तिचं कौतुक करा.
त्याला पैसे पडत नाहीत.
पण नेमकं हेच करता येत नाही.

बरं वाटणं हे खरं वाटण असतं
जे पोटात तेच ओठात असतं

व्हाट्सअपवर चांगलंही येतं, चांगलं वाचलं तर चांगलं कळतं. पण चांगल्याला चांगलं म्हणण्याची,
चांगल्या–चांगल्या वेळी,
चांगल्या–चांगल्यानांही कळत नाही.
इथे संवाद संपतो मग.

युनोनी दिवस २० तासांचा केलेला नाही.

सगळ्यांना सारखीच वेळ आहे. आवड असली की सवड मिळते. जशी दृष्टी तशी सृष्टी असते. मरणाच्या दारातल्या माणसाला एकदा विचारलं की, शेवटची तुझी इच्छा काय ?

त्यावर तो म्हणाला की,

अद्याप ज्यांच्याशी बोललो नाही, त्यांच्याशी मला संवाद साधायचा आहे.

मनसोक्त बोलायचं आहे. अश्रूंचीही एक भाषा असते. रडण्यात ही संवाद असतो. डोळ्याचीही भाषा असते.

ती कळली म्हणजे संवाद कळल्यासारखे आहे.
उंबरा फुटला की, सेवा फुटते.
उंबरा फुटू द्यायचा नाही. प्रत्येकांच्या
वाटा वेगवेगळ्या असल्या तरी ध्येय एकच असले पाहिजे.

माणूसरुपी ढगांच्या आकाशातून टाळ्यांचा कडकडाट होऊन पाऊस पडतो.

तेव्हा संवादरुपी आल्हाददायक वातावरण तयार होतं.

सामाजही एक कुटुंबच आहे. स्टाफरुममध्ये आम्ही मुके,

आणि मोबाईल बोलका असतो. म्हणून ......

तंत्र, यंत्र, मंत्र, महामंत्र वापरून संवादाची मालिका निर्माण करायला पाहिजे. मोबाईल घेण्याची वेळ सकाळची जास्त असते.

रात्री माणूस ऑनलाईन वर मस्त असतो

गुगल दीड तास बंद पडला तेव्हा अनेक तरुणांनी आत्महत्या केली. म्हणून मोबाईल अति वापरायचं हे विसरायला पाहिजे.

म्हणजेच विसरायचं हे लक्षात ठेवलं पाहिजे.
आणि लक्षात ठेवलेलं विसरायला पाहिजे.

फास्ट फुडच्या जमान्यात फास्ट झालो.
मुलांच्या डब्यात रोल भरतो
आणि...!
मुलं गाडीच्या डब्यात भरतो
अशी परिस्थिती आहे.
वाद न करता,

संवाद साधून हरवलेल्या कुटुंबाला पुन्हा एकदा संवादाची नव संजीवनी देवूया.

एवढ्या माफक विचाराला विराम देऊन थांबतो.

संदर्भ :– श्री. महेंद्र कुलकर्णी सर यांच्या भाषणाच्या सारांश.

# भरत आणि भारत

**श्री. प्रमोद पाटील, ९८६०९२६०८२**
एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली

आपल्या देशाच्या नावाशी निगडित इतिहास माहित नसलेल्या लोकात भारतीयांची बरोबरी जगभरात कोणीही करू शकणार नाही. म्हणून आमच्या देशाच्या नावासंबंधीचा खराखुरा सप्रमाण, साद्यंत इतिहास सर्वांसमोर अविरोधपणे मांडण्याची नितांत आवश्यकता आहे. आज आपल्या देशाची १) आर्यावर्त, २) भारत वर्ष, ३) हिंदुस्थान व ४) इंडिया अशी चार नावे प्रचलित आहेत. यातील पहिली दोन मुळात भारतीय संस्कृतीतील लोकांनी ठेवली आहेत तर 'हिंदुस्थान' नाव उर्दू भाषिक विदेशीयांनी आणि 'इंडिया' हे नाव युरोपियनांनी ठेवलेली परदेशी नावे आहेत.

आपल्या देशाचे मूळ नांव **'अजनाभवर्ष'** असे होते, हे क्वचितच कोणाला माहित असेल. जैन परंपरेतील प्रथम तीर्थंकर, आदिब्रह्म वृषभदेव यांचे पिता व वर्तमान अवसर्पिणी काळातील चौदावे मनू 'नाभिराज' तथा 'अजनाभ' यांच्या नावावरून आपल्या देशाला हे नाव पडले आणि 'श्रमण' व 'वैदिक' या प्राचीन भारतीय मूलभूत दोन्ही संस्कृतींनी ही वस्तुस्थिती एकसुरात मान्य केली आहे. वैदिक परंपरेतील 'भागवता'त या संबंधी–

**अजनभं नामैतद्वर्षं भारतमिति यत आरभ्य व्यपदिशन्ति!** (भागवत, ५/७/३)

अर्थात् – हिमालय पर्वतापासून समुद्रापर्यंतचा हा देश 'नाभिखंड अजनाभवर्ष' या नावाने ओळखला जाई. असे असले, तरी आजपर्यंत प्रकाशित झालेल्या अधिकतर कोषग्रंथात या महत्त्वपूर्ण बाबींचा उल्लेख आढळत नाही, ही खेदाची गोष्ट आहे. आद्य तीर्थंकर वृषभदेव हे या नाभिराजांचे पुत्र होते. त्यांनी आपण स्वतः केलेल्या अध्यात्म साधनेद्वारा, या देशाला सर्व प्रकारे सुसंस्कारित केले. ते उत्कृष्ट क्षत्रिय कुलोत्पन्न होते म्हणूनच....



**'क्षत्रस्य नाभिरसि, क्षत्रस्य योनिरसि इति'**–

(तैतरय ब्राह्मण २/६/५ पृ. ६२३)

अर्थात – 'नाभिराज स्वतः क्षत्रिय होते. त्यांनी या देशात क्षत्रिय परंपरा प्रवर्तित केली' असे म्हटले आहे. कोषकारांनीही त्यांना 'क्षत्रियांचे प्रमुख' मानले आहे.–

**'नाभिमुख्य नृपे चक्रामध्ये क्षत्रियो पुत्रान्'**

(मेदिनीकोष, १०६/५–६)

क्षत्रिय परंपरेद्वारा, आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे प्रवर्तन व संरक्षण झाले असल्याने उपनिषदामध्येही क्षत्रियांची यशोगाथा गाइली आहे.

**'तस्मात् क्षत्रात्परं नास्ति!'**

(छांदोग्य उपनिषद, १/४/११)

अर्थात् – आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे प्रवर्तक असल्यामुळे क्षत्रियापेक्षा श्रेष्ठ असे अन्य कोणी नाहीत. क्षत्रिय परंपरेद्वारा हे आध्यात्मिक तत्त्वज्ञान प्राप्त झाले असल्याचे, आद्य शंकराचार्य यांनीही स्पष्ट शब्दात मान्य केले आहे.

**'एवं क्षत्रिय परंपराप्राप्तिम्' –**

(गीता शंकरभाष्य, ४/२)

नाभिराजाप्रमाणेच तीर्थंकर वृषभदेवांच्या यशोगाथाही संपूर्ण वेद आणि पुराण परंपरेत सर्वत्र आढळतात. वृषभदेवांनीच जैन धर्माचे प्रवर्तन केले, उर्वरित तेवीस तीर्थंकरही याच परंपरेत होऊन गेले.

प्रसिध्द विद्वान पं. बलदेव उपाध्याय यांनी यांच्यासंबंधी लिहिलंय की– 'आपल्या धर्माचा प्रचार करून, सिध्दपद प्राप्त केलेल्या महापुरुषांना जैन लोक 'तीर्थंकर' असे म्हणतात. 'वृषभदेव' हे त्यातील आद्य तीर्थंकर होत. त्यांच्यासंबंधीच्या पुराणातील उल्लेखावरून, त्यांच्या ऐतिहासिकते–विषयी शंका रहात नाही. 'श्रीमद्भागवता'तील कित्येक अध्याय (स्कंध ५, अध्याय ४–६) वृषभनाथांच्या वर्णनासाठी खर्ची पडले आहेत. ते मनुवंशी राजा नाभि आणि महाराणी मरुदेवी यांचे पुत्र होते. त्यांची विजय वैजयंती संपूर्ण पृथ्वीतलावर फडकत होती.' (भारतीय दर्शन, पृष्ठ ८८) प्रख्यात इतिहासतज्ज्ञ डॉ. वासुदेवशरण अगरवाल यांनी या विषयी अधिक परिचय करून देताना लिहिलंय– 'आद्य मनू स्वायंभुव यांचे पुत्र प्रियव्रत, प्रियव्रताचे पुत्र अग्नीघ्र, अग्नीघ्र यांचे पुत्र नाभी आणि या नाभीचे पुत्र वृषभ होत. या वृषभदेवांना शंभर पुत्र होते. भरत हे त्यांच्यात ज्येष्ठ होते. 'नाभी' यांना 'अजनाभ' असेही म्हणत, ते अत्यंत पराक्रमी होते आणि त्यांच्या नावावरून या देशाला 'अजनाभवर्ष' असे म्हणू लागले. प्रियव्रताने आपल्या अग्नीघ्र आदि सात मुलांना सात द्वीपांचे राज्य वाटून दिले. यात अग्नीघ्र याला जंबूद्वीपाचे राज्य मिळाले. अग्नीघ्र आणि राणी 'पूर्वचिती' अप्सरा यांना नवखंडावर राज्य करणारे नऊ राजपुत्र जन्मले. 'नाभी' हे त्यांच्यात ज्येष्ठ होते. त्यांना 'अजनाभ खंडा'चे राज्य मिळाले. तो 'अजनाभ खंड'चे नंतरच्या काळात 'भरतखंड' या नावाने ओळखला जाऊ लागला. कारण नाभि यांचे नातू भरत हे त्यांच्यापेक्षा अधिक प्रतापशाली चक्रवर्ती होत. अत्यंत मौलिक अशी ही ऐतिहासिक परंपरा या ना त्या प्रकारे पुराणांत तरी सुरक्षित राहिली आहे.' ('जैन साहित्य का इतिहास', प्रस्तावना पृ. ८) वृषभदेवांचे पुत्र भरत चक्रवर्ती, षट्खंडाधिपती झाले, तेव्हा त्यांच्या आनंदाप्रीत्यर्थ विद्वान आणि प्रजानन 'अजनाभवर्षा'ला 'भारतवर्ष' असे संबोधू लागले. भागवतकार लिहितात–

**'येषां खलु महायोगी भरतो श्रेष्ठः श्रेष्ठगुणाश्चासीत्!**
**येनेदं वर्षं भारतमिति व्यपदिशन्ति!'**

(श्रीमद्भागवत ५/४/९)

भारतीय परंपरेत, एकूण 'भरत' नावाचे चार प्रमुख प्रसिध्द महापुरुष होऊन गेले. १) वृषभदेवांचे पुत्र प्रथम चक्रवर्ती भरत, २) राजा दशरथ यांचे पुत्र व श्रीरामांचे बंधू भरत, ३) राजा दुष्यंत यांचे पुत्र भरत व ४) नाट्यशास्त्र रचयिता भरत हे ते चार महापुरुष होत. (पहा– अभिधान राजेंद्र कोश, भाग ५, पृष्ठ १३८५) यांच्यात वृषभदेव पुत्र भरत चक्रवर्ती हेच सर्वात अधिक प्राचीन व प्रभावशाली व्यक्ती होते. म्हणून त्यांच्या नावावरूनच या देशाचे 'भारतवर्ष' असे नामकरण करण्यात आले. काही विद्वान 'दुष्यंतपुत्र भरताच्या नावावरून या देशाला 'भारतवर्ष' नाव प्राप्त झाले' असे म्हणत असतात, तथापि सर्व निःपक्षपाती विद्वानांनी वृषभदेवांचे पुत्र चक्रवर्ती भरत यांच्यावरूनच या देशाला 'भारतवर्ष' नाव प्राप्त झाल्याचे मानतात. डॉ. वासुदेवशरण अगरवाल यांनीही प्रारंभी दुष्यंतपुत्र भरताच्या नावावरूनच या देशाला 'भारतवर्ष' असे संबोधण्यात येते असे म्हणाले होते. पण नंतर त्यांना आपली चूक उमगली आणि 'मैंने अपनी भारत की मौलिक एकता' नामक पुस्तक में पृष्ठ २२–२४ पर दौष्यन्ति भरत से 'भारतवर्ष' लिखकर भूल की थी। इसकी ओर मेरा ध्यान कुछ मित्रों ने आकर्षित किया, उसे अब सुधार लेना चाहिए।' अशी प्रांजळ कबुली त्यांनी नंतरच्या अपाल्या 'मार्कंडेय पुराण – एक अध्ययन' नामक ग्रंथात पृष्ठ १३८ वरील १ नंबरच्या तळटीपेत दिली. तसेच त्याच पृष्ठावर वैदिक पुराणांच्या संदर्भात स्पष्टीकरण देताना 'भारत वर्ष' या नावाचा संबंध 'नाभिराजाचे नातू' आणि 'वृषभदेवांचे पुत्र' 'भरत' यांच्याशी आहे. (उदा. वायुपुराण ३३/५२); दुष्यन्त आणि शकुंतला यांचा पुत्र भरताशी 'भारत' नावाचा संबंध असल्याचे कोणत्याही पुराणाने सांगितले नाही, ही बाब आपण स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे' असे त्यांनी म्हटले आहे. या संपूर्ण विषयाचा समारोप करताना पद्मभूषण रामधारी सिंह दिनकर यांनी लिहिलंय – 'जैन धर्म हा

बौध्द धर्मापेक्षा प्राचीन, खूप प्राचीन धर्म आहे. इतकेच नाही तर, तो वैदिक धर्माइतका प्राचीन आहे.

जैन परंपरेनुसार आपल्या देशात चौदा मनू होऊन गेले. नाभिराज हे अंतिम मनू होते. त्यांचे पुत्र वृषभदेव यांनीच अहिंसा आणि अनेकांतवाद आदींचे प्रवर्तन केले. भरत चक्रवर्ती हे या वृषभदेवांचे पुत्र होते. त्यांच्या नावावरूनच आमच्या देशाला 'भारत' हे नाव पडले.' खाली वृषभदेव आणि चक्रवर्ती यांच्यासंबंधीचे महत्त्वपूर्ण तथ्यांश सांगितले आहे. त्यावरूनच संपूर्ण भारतीय परंपरेत त्यांची यशोगाथा का गायली जाते, याची कारण मीमांसा कळून येईल- श्रावण वद्य प्रतिपदेच्या शुभदिनी वृषभदेवांनी येथे 'कर्मयुगा'चा प्रारंभ केला. त्यांनी 'असि', 'मसि', 'कृषि', 'विद्या', 'वाणिज्य' आणि 'शिल्पकला' या षट्कर्मांचे येथील लोकांना शिक्षण दिले. त्याद्वारे लोकांना आपल्या चरितार्थाला उपयुक्त माहिती सांगितली. त्याबरोबरच आपली प्रथम कन्या 'ब्राह्मी'ला 'लिपि-विद्या' आणि दुसरी कन्या 'सुंदरी'ला 'अंक-विद्या' शिकविली. तसेच राज्यकारभाराची नीट व्यवस्था लावण्यासाठी, त्यांनी संपूर्ण 'अजनाभ वर्षा'चे ५२ 'जनपदा'त विभागणी करून तेथे सुव्यवस्था प्रस्थापित केली. त्यांचे पुत्र भरत यांनी, षट्खंड जिंकून प्रथम चक्रवर्ती या नात्याने संपूर्ण देश आपल्या एकछत्री अंमलाखाली आणल्यानंतर, अयोध्येत राहून त्यांनी अनेक नव-नवीन परंपरांना जन्म दिला. त्यांनी तीर्थंकर मूर्ती आणि त्यासाठी मंदिर निर्माण केले. स्तूप निर्माण केले. भगवंताचे सदोदित दर्शन घडावे, त्यांची स्मृती सदैव जागृत रहावी, यासाठी त्यांनी गोपुर, राजप्रासादाचे प्रवेशद्वार आणि मेहराव यांच्यावर मोठमोठ्या घंटा आणि छोट्या छोट्या घंटामालिका लटकाविल्या. त्यांच्यावर भ. वृषभदेवांच्या प्रतिमा कोरलेल्या असत. त्यांना 'वंदनमाला' असे म्हणत. या मोठ्या घंटा आणि छोट्या घंटा म्हणजे कैलास पर्वताच्या प्रतिकृती असत. प्रजाजनही आपल्या सम्राटांचे अनुकरण करत, आपल्या घरावरही वंदनमाला बांधू लागले. सम्राट भरत यांनी आपल्या काळात, अयोध्येत मूर्ती, स्तूप आणि वंदनमाला आदींची परंपरा सुरू केली. लाखो वर्षानंतर भारतभर आजही ती परंपरा चालू आहे. याच भरत चक्रवर्तीच्या नावाने प्रसिध्द असलेल्या आपल्या या देशाचे नाव सम्राट खारवेल यांनीही जगप्रसिध्द हाथीगुंफा येथील ऐतिहासिक शिलालेखात 'भारतवर्ष' (भरधवस) असे लिहून, चक्रवर्ती भरत यांच्या काळापासून आपल्या युगापर्यंत अविरतपणे चालत आलेल्या परंपरागत 'भारतवर्ष' या नावाला अधिकृतपणा मिळवून दिला. तद्वतच आता स्वातंत्र्योत्तर काळात, पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी अनेक विद्वानांशी परामर्श करून सम्राट खारवेल यांच्या शिलालेखाच्या आधारावरव आपल्या देशाचे वैधानिक नाव म्हणून 'भारत वर्ष' या नावाला स्वीकृति दिली. 'इंडस्' च्या आधारे निर्माण झालेले 'इंडिया' हे नाव मूळ भारतीय नाव नाही. 'आर्यावर्त' या नावाला आर्यांची अथवा प्रतिष्ठित लोकांची भूमी असे मर्यादित अर्थ प्राप्त झाल्याने, केवळ एक विशेषण म्हणून, विशिष्ट प्रसंगी त्याचा उपयोग करण्यात येऊ लागला.



**हार्दिक अभिनंदन...!!!**

चिरंजीव सम्मेद शीतल चौगुले याने चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले आहे. भोसे येथील सौ. स्मिता व श्री. शीतल गजकुमार चौगुले यांचा चिरंजीव तर धर्मानुरागी स्व. कमल आणि श्री. गजकुमार तिप्पाण्णा चौगुले यांचा नातू आहे. डॉ. सौ. सुरेखा संजय नरदे, सांगली (प्राकृत व जैनदर्शन अभ्यासक व द. भा. जैन सभा- ग्रॅज्युएट्स असोसिएशनच्या संचालक) यांचा तो भाचा आहे. या यशाबद्दल सम्मेदचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# पं. श्री. आलोकजी शास्त्री यांना पीएच. डी. प्राप्त



कारंजा (लाड) येथील श्री महावीर ब्रह्मचार्यश्रम हायस्कूलचे सेवानिवृत्त शिक्षक श्री आलोक कडूबा घोडके उर्फ आलोक शास्त्री ह्यांना दमोह (मध्यप्रदेश) येथील एकलव्य विद्यापीठा- मार्फत दि. १३/१०/२०२५ रोजी पीएच. डी. (विद्यावारिधि) ही उपाधी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या पीएच. डी. प्रबंधाचा विषय **आचार्य पूज्यपाद कृत सर्वार्थसिद्धी का समीक्षात्मक अध्ययन** हा होता.

धार्मिक विषय कठीण असून ही शोधार्थी या भूमिकेत त्यांनी अत्यंत सरल भाषेत उपरोक्त विषयाचे सादरीकरण केले. त्यामागे त्यांचे अथक परिश्रम, अभ्यास, मनन व चिंतन आहे. आयुष्याच्या उत्तरार्धात ही ज्ञानसाधना न थांबविता सातत्यपूर्ण अभ्यास जिद्द आणि संस्कृतचे प्रेम यांच्या बळावर त्यांनी आचार्य पूज्यपादकृत सर्वार्थसिद्धी या जैन धर्माच्या प्राचीन आणि महत्त्वपूर्ण ग्रंथावर समीक्षात्मक संशोधन सादर करून ही उपाधी प्राप्त केली आहे.

श्री. म. ब्र. आश्रम ट्रस्टचे सर्व विश्वस्त, श्री म. ब्र. आश्रम हायस्कूल, श्री समंतभद्र प्राथमिक शाळा, श्रीमती सुमित्रादेवी देवकीनंदनजी नायक बालविकास मंदिर व श्री म. ब्र. आश्रम प्राथमिक शाळेचे सर्व शिक्षक वृंद ह्यांच्या तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

श्री. आलोकजी शास्त्री यांचे जन्मगाव जालना जिल्ह्यातील लोणगाव हे असून येथेच त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले तसेच उच्च प्राथमिक शिक्षण श्री पा. ब्र. आश्रम वेरूळ येथे झाले. माध्यमिक शिक्षण श्री बाहुबली ब्र. आश्रमातून पूर्ण केले. त्या नंतर गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या व मुनीश्री आर्यनंदी महाराजांच्या प्रेरणेने जयपूर येथील श्री टोडरमल स्मारक ट्रस्ट संचालित श्री टोडरमल सिद्धांत महाविद्यालयातून शास्त्री व संस्कृत विषयात जैन दर्शनाचार्य (एम. ए.) ही पदवी मिळविली तसेच सोलापूर येथून बी. एड्. पूर्ण केले.

श्री. आलोकजी शास्त्री श्री म. ब्र. आश्रम हायस्कूल कारंजा येथे इ. स. १९९८ मध्ये संस्कृत शिक्षक म्हणून रुजू झाले. इ. स. २०१८ मध्ये सेवानिवृत्त झाले. धर्म अध्ययन-अध्यापन व गुरुकुल विषयीचे आत्मीय भाव त्यांना स्वस्थ बसू देईनात. ते गुरुकुलच्या विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षण, प्रवचन व स्वाध्याय याद्वारे निरंतर मार्गदर्शन करत होते. याचबरोबर जैन तत्त्वज्ञानाचा संपूर्ण भारतभर प्रचार व प्रसार केला. इतकेच नव्हे तर २०१३ मध्ये कॅनडा येथील टोरँटो येथे पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सवात आपला सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांना धर्म अध्यापनात अत्यंत रुची असून त्यांचे समयसारादि आचार्य कुंदकुंद स्वामी रचित सर्व धर्मग्रंथांचे व इतरही धर्मग्रंथांचे आत्मीयतेने सखोल अध्ययन व अध्यापन सुरूच आहे. याचबरोबर सामाजिक कार्यातही यथायोग्य सहयोग असतो.

श्री महावीर ज्ञानोपासना समिती, कंकुबाई पाठ्यपुस्तकमाला व श्री म. ब्र. आश्रम द्वारा प्रकाशित ग्रंथ व पुस्तके प्रकाशित करण्यास आत्मीय भावनेतून ग्रंथांचे वाचन, लिखाण व प्रेस मध्ये जाऊन शुद्धीकरण करणे हे कार्य ते करतच असतात.

श्री. आलोकजी शास्त्री यांनी हे संशोधन कार्य एकलव्य विद्यापीठाचे संस्कृत विभागाचे प्रमुख प्राध्यापक डॉ. आशिषकुमार जैन शिक्षाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

प्रेषक- श्री. राजकुमार डोणगावकर, कारंजा

## बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठाचा ९१वा वार्षिकोत्सव व रथोत्सव उत्साहात संपन्न

श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम व विद्यापीठाचा ९१वा वार्षिकोत्सव व रथोत्सव उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमास परमपूज्य मुनी श्री १०८ स्वभावसागरजी महाराज यांचे मंगल सानिध्य लाभले. अध्यक्ष म्हणून चोपडे मेमोरियल हॉस्पिटल, सांगलीचे आशुतोष चोपडे हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी दीपक पाटील इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड, इचलकरंजीचे दीपक पाटील होते.

स्वागत व प्रास्ताविक जनतारा शैक्षणिक संकुल जयसिंगपूरचे मुख्याध्यापक दीपक वाडकर यांनी केले. अतिथी परिचय व्यवसाय विभाग प्रमुख अरुण चौगुले यांनी केले.

बाहुबली दिनदर्शिका-२०२६ व डॉ. अशोक रावजी नाईक लिखित मुनिश्री विद्यासागर चरित्र या पुस्तकाचे विमोचन प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

विद्यार्थी मनोगतामध्ये रिध्वी सांगावे व अन्वी कांबळे यांनी संस्थेबद्दल मनोगत व्यक्त केले. अतिथी मनोगतामध्ये इचलकरंजीचे दीपक पाटील यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची गरज व्यक्त केली. शिक्षणाबरोबरच शिस्त, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपली क्षमता ओळखून स्पर्धा परीक्षा आणि जीवनातील विविध क्षेत्रांत यश संपादन करावे असा संदेश दिला.

संस्था प्रतिनिधी मनोगतामध्ये संचालक गोमटेश बेडगे यांनी संस्थेमधील चाललेल्या विविध विकासकामांची माहिती सांगितली. तसेच सर्व शाखेतील निकालाची परंपरा, गुरुकुल पद्धती, नवीन वसतिगृह, जैन धर्म व त्यामध्ये असणारे संस्कार हे टिकवणे गरजेचे आहे. यावरती संस्थेचा विकास होत राहील असे सांगितले.

अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. आशुतोष चोपडे यांनी आपल्या मनोगतामध्ये बाहुबलीतील गुरुजनामुळेच मी घडलो. गुरुकुल शिक्षणपद्धती हीच आदर्श समाजव्यवस्था आहे. गुरुकुलचा विद्यार्थी हा चांगला संस्कारक्षमच असतो. विद्यार्थी हा वर्तमानकाळात धर्माला वेळ देणारा असला पाहिजे असे सांगितले व संस्थेला पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या.

परमपूज्य मुनी १०८ श्री स्वभावसागरजी महाराज यांचे मंगल आशीर्वचन लाभले त्यांनी गुरुकुल मधून शिकणारा हा विद्यार्थी भविष्य-काळातील एक नक्कीच माणिक-मोतीपेक्षाही तो मौल्यवान असेल. अशोक नाईक यांनी आपल्या प्रकाशन झालेल्या पुस्तकाबद्दल थोडक्यात माहिती सांगितली.

यावेळी बाहुबलीच्या शाखांतर्गत इयत्ता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती संस्थेचे महामंत्री दादासाहेब पाटील, कोषाध्यक्ष बाबासाहेब पाटील, तात्यासाहेब अथणे, रवींद्र खोत, सुरेश चौगुले, आप्पासाहेब चौगुले, प्रदीप पाटील, विविध शाखेतील प्राथमिक व माध्यमिक विभागातील अध्यापक, अध्यापिका, श्रावक, श्राविका, स्नातक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुपारी तीन वाजता भव्य अशी रथयात्रा संपन्न झाली. याचे मुख्य यजमानपद श्रेयस व श्वेता सुकुमार पाटील, सांगली यांना मिळाला. तसेच रथोत्सवानंतर बाहुबली बृहन्मूर्तीचा चरणाभिषेक संपन्न झाला. चंद्रकांत तेरदाळे यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन स्मिता निटवे, आशुतोष व्हनवाडे व प्रदीप धोतरे यांनी केले.

बाहुबली गुरुकुल प्रांगणामध्ये सायंकाळी सात वाजल्यापासून विद्यार्थ्यांचे कसरतीचे खेळ व कला-सांस्कृतिक सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हातकणंगले पोलीस स्टेशनचे पीएसआय (PSI) पिलाणे साहेब हे होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक क्रीडाध्यापक शरद जुगळे यांनी केले. प्रमुख अतिथींच्या हस्ते

श्रीफळ वाढवून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यांचे सहकारी मधाळे, जावधर व गावडे साहेब याप्रसंगी उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी विविध कसरती, योगासन व पिरॅमिडच्या प्रात्यक्षिकांद्वारे अपूर्व शारीरिक कौशल्याचे प्रदर्शन केले. सहकार्य पवन नेजकर व उदय पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांच्या प्रभावी सादरीकरणाला उपस्थित प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

वरील कार्यक्रमानंतर इयत्ता पाचवी ते नववी व अकरावीच्या विद्यार्थ्यांचा विविध कला गुणदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये पाचवीच्या विद्यार्थ्यांनी धार्मिक गीत, सहावीच्या विद्यार्थ्यांनी शेतकरी जीवन व्यथा, सातवीच्या विद्यार्थ्यांनी हॉरर कॉमेडी गीत, आठवीच्या विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूर, इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी कोळीनृत्य व अकरावीच्या विद्यार्थ्यांनी चार युग अशा विविध कलात्मक सादरीकरणांमधून विद्यार्थ्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. या कार्यक्रमासाठी अध्यापक-अध्यापिका, विद्यार्थी, स्नातक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी बाहुबली विद्यापीठाची शाखांतर्गत अध्यापक-अध्यापिका कार्यशाळा संपन्न.

श्री बाहुबली विद्यापीठ, बाहुबली शाखांतर्गत अध्यापक-अध्यापिका मार्गदर्शन कार्यशाळा रविवार, दि. २ नोव्हेंबर रोजी बाहुबली येथे सानंद संपन्न झाली. संचालक गोमटेश बेडगे यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना प्रतिज्ञा दिली. स्वागत व प्रास्ताविक दीपक वाडकर यांनी या कार्यशाळेचा उद्देश समजावून सांगितला.

पहिल्या सत्रामध्ये ॲड. श्रीकांत माळकर यांनी 'विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासातील शिक्षकांचे योगदान' याविषयावरती मार्गदर्शन केले, त्यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक ते ज्ञान देणे, कष्टाची जाणीव करून देणे, विद्यार्थ्यांच्यामध्ये शिस्त, आत्मविश्वास, दृष्टिकोन, आदर, नम्रता व श्रद्धा घडवणे आवश्यक आहे.

दुसऱ्या सत्रामध्ये 'बदलती जीवनशैली आणि शिक्षकांपुढील आव्हाने' यावरती मार्गदर्शन डाएट सांगलीचे प्राचार्य डॉ. विकास सलगर यांनी आपल्या मनोगतामध्ये शिक्षक स्वतः अपडेट राहणे आवश्यक आहे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना समजून घेणे, मुलांना शिकण्यास प्रेरणा, जिज्ञासूवृत्ती जोपासणे गरजेचे आहे, अनेक उदाहरणांच्या माध्यमाद्वारे ते शिक्षकांनी कशा पद्धतीने आत्मसात करावे ते सांगितले.

तिसऱ्या व शेवटच्या सत्रामध्ये अण्णासाहेब राजमाने विद्यालय रुईचे अध्यापक गणेश माने सर यांनी 'आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणातील वापर' याविषयावरती शिक्षकांना उद्बोधन केले. त्यांनी यामध्ये सर्वच विषयासाठी उपयुक्त असणारे विविध ॲप्सची माहिती दिली. तंत्रज्ञानाचा वापर शिक्षणामध्ये कशा पद्धतीने करावा ते सविस्तर सांगितले. चॅटजीपीटी, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) बद्दल सविस्तर माहिती सांगितली.

समारोपाच्या कार्यक्रमांमध्ये संस्थेचे कोषाध्यक्ष बाबासाहेब पाटील यांची उपस्थिती लाभली. महामंत्री दादासाहेब पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी सतत नवनवीन अध्यापन पद्धती आत्मसात करून शिक्षण अधिक प्रभावी करावे यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. शालेय समितीचे सहसचिव सुरेश चौगुले यांनी कार्यशाळेचा थोडक्यात आढावा घेतला. अध्यापक मनोगतामध्ये संजय चौगुले व तेजस्विता पाटील यांनी या कार्यशाळेचा अनुभव सांगितला. संस्थेचे संचालक गोमटेश बेडगे यांनी मनोगतामध्ये प्रशिक्षणाची का गरज आहे? तसेच शिक्षक स्वतःअपडेट राहणे गरजेचे आहे ते सांगितले. संस्थेच्या व विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी प्रत्येक शिक्षकांनी कर्तव्यनिष्ठ राहणे गरजेचे आहे असे सांगितले.

तसेच शालेय समितीचे सचिव ऋषभनाथ मलिकवाडे यांचे देखील बहुमोल सहकार्य लाभले.

तसेच या कार्यक्रमासाठी संस्थेचे सर्वच पदाधिकारी यामध्ये रवींद्र खोत, बालविकास विद्यामंदिरचे चेअरमन तात्यासाहेब अथणे, शाखेतील सर्व मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, अध्यापक, अध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. आभार सुनिता करके यांनी मानले. मेरी भावनेने या कार्यशाळेची सांगता झाली.

**आदित्य पाटील युथ फाऊंडेशन व एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली यांच्या संयुक्त विद्यमाने 'ताई माझी लाडकी' आरोग्य संरक्षणाकडे जागरूक पाऊल हा कार्यक्रम संपन्न.**

दि. ७/११/२०२५ रोजी आदित्य युथ फाऊंडेशन व एम. जी. शहा विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज, बाहुबली यांच्या संयुक्त विद्यमाने 'ताई माझी लाडकी' या योजनेअंतर्गत गर्भाशय मुखाचा कर्करोग प्रतिबंधात्मक लसीकरण आणि सॅनिटरी पॅड वाटप हा कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख उपस्थिती हातकणंगले विधानसभेचे आमदार अशोकराव माने होते. पद्मावती पाटील (काकी), सुरेखा पाटील (वहिनी) उपस्थित होते. आदित्य पाटील युथ फाऊंडेशन, कुंभोजचे प्रमुख आदित्य अरुण पाटील उपस्थित होते. विद्यालयाच्या प्रांगणामध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

हातकणंगले विधानसभेचे आमदार अशोकराव माने (बापू) यांनी आपल्या मनोगतामधून महिला आरोग्य, स्वच्छता आणि गर्भाशय मुखाच्या कर्करोगाबाबत जागरूकता याविषयी मार्गदर्शन केले. या आजाराचे वेळेवर निदान, प्रतिबंधक लस आणि सुरक्षित आरोग्यविषयक सवयींचे महत्त्व सांगितले. गर्भाशय मुखाच्या कर्करोगासंदर्भातील अज्ञान, गैरसमज आणि भीती दूर करण्याची गरज अधोरेखित केली. मुलगी शिकली तर संपूर्ण समाज घडतो. आणि तिचे आरोग्य हे तिचे पहिले संरक्षण, असा हळुवार पण ठाम संदेश त्यांनी दिला. रोटरी क्लबच्या सौजन्याने विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे मुक्त वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी तालुका आरोग्य अधिकारी हातकणंगलेचे प्रसाद दातार, शुभांगी आपटे, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र, कुंभोजचे डॉ. अभिनंदन पाटील, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाउन फोनिक्सचे रोटे. केतन मेहता, अध्यक्ष, इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूर शक्तीचे रोटे. अमृता पारेख, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर मिडटाऊन फोनिक्सचे रोटे. अजय चव्हाण, प्राथमिक आरोग्य केंद्र, कुंभोजचे सर्व आरोग्य तपासणी, सेवक, कर्मचारी, अध्यापक-अध्यापिका, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. प्रशालेचे पर्यवेक्षक डॉ. नेमिनाथ बाळीकाई यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता निटवे यांनी केले.

**श्री जैन सिद्धांत प्रवेशिका या ग्रंथाचा विमोचन समारोह संपन्न**



श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुलमध्ये श्री जैन सिद्धांत प्रवेशिका या ग्रंथाच्या मराठी अनुवाद-संशोधित संस्करणाच्या विमोचन समारोहाचे आयोजन शनिवार दि. ११ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले होते. या वेळी आयोजित समारोहाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष श्री. सतीशजी संगई, ग्रंथ विमोचनकर्ता म्हणून बा. ब्र. सुमतप्रकाशजी उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून ग्रंथाच्या संपादिका विदुषी पं. विजयाताई भीसीकर उपस्थित होत्या.

यावेळी श्रीमती प्रांजली रुईवाले यांनी सदर ग्रंथाच्या संपादन कार्याचा आढावा मांडला तर, सहसंपादिका श्रीमती प्रज्ञा डोणगावकर यांनी या ग्रंथासाठी मार्गदर्शन करणाऱ्या, सहयोग करणाऱ्या सर्वांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच संपादिका

श्रीमती विजयाताई भीसीकर यांनी आपल्या मनोगतातून सदर ग्रंथाचा इतिहास आणि यापूर्वीच्या आवृत्ती व नूतन आवृत्ती यामधील बारकावे मांडले. ग्रन्थ विमोचन संदर्भात बोलताना सुमतप्रकाशजी यांनी श्री जैन सिद्धांत प्रवेशिका जैन तत्त्वज्ञानाच्या सखोल अभ्यासासाठी प्रवेशिकेची उपयोगिता याविषयी मार्गदर्शन केले.

प्रसंगाचे औचित्य साधून नुकतीच एकलव्य विद्यापीठ, दमोह येथून PH.D. प्राप्त केल्याबद्दल संस्थेचे डॉ. आलोकजी शास्त्री यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. सतीशजी संगई यांनी श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम (जैन गुरुकुल) संस्थेच्या विविध उपक्रमांतर्गत ग्रंथ विमोचनाच्या कार्याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. भरत भोरे आणि संचालन व आभार श्री. चिंतामण भूस यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे विश्वस्त श्री. प्रमोद चवरे, श्री. सुहास चवरे, श्री. परिमल रुईवाले, श्री. पीयूष डोणगावकर, श्री. उद्धर चवरे, संस्थेद्वारे संचालित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच शहरातील साधर्मी बंधू-भगिनी उपस्थित होते.

## कंकुबाई कन्या शाळेला सुपर कॉम्प्युटरचे जनक डॉ. विजय भटकर यांची सदिच्छा भेट

कारंजा (लाड) दि. १ डिसेंबर २०२५ रोजी शाळेला देशाचे प्रख्यात संगणक तज्ज्ञ, परम संगणकाचे जनक, महाराष्ट्र भूषण, पद्मश्री, पद्मभूषण इ. विविध पुरस्काराने सन्मानित महान शास्त्रज्ञ डॉ. विजय भटकर यांनी शाळेला सदिच्छा भेट दिली. शिक्षिका व विद्यार्थिनींशी संवाद साधला. त्यांची सदिच्छा भेट ही कंकुबाई परिवारासाठी अतिशय भूषणावह बाब आहे. मा. डॉ. विजय भटकर यांचे स्वागत संस्थेचे सचिव संजीवभाऊ रूईवाले व कोषाध्यक्ष श्री. शिरीषभाऊ चवरे यांनी पुष्पगुच्छ आणि ग्रंथभेट देवून केले. प्रज्ञाताई डोणगावकर यांनी सरांना संस्थेचा व शाळेचा गौरवशाली इतिहास थोडक्यात सांगितला. शाळा राबवित असलेल्या विविध उपक्रमांविषयी माहिती सांगितली. शाळेतील विविध उपक्रमांची माहिती घेताना त्यांनी शाळेचे तंत्रज्ञानाधारित शिक्षण, नवीन उपक्रम आणि विद्यार्थिनींची प्रगती याबद्दल समाधान व्यक्त केले.

डिजिटल बोर्डवर शाळेचे ग्रंथालय, कॉम्प्युटर लॅब, अटल टिंकरिंग लॅब, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या थोडक्यात असलेल्या व्हिडिओ क्लिप्स् सरांनी अतिशय उत्साहाने आणि आनंदाने बघितल्या. डॉ. भटकर यांनी आपल्या शालेय शिक्षणाबद्दल माहिती दिली. देशातील डिजिटल क्रांतीबाबत प्रेरणादायी विचार मांडले. भविष्यातील तंत्रज्ञानाच्या विविध क्षेत्रात आपल्या शाळेच्या विद्यार्थिनी नक्कीच अग्रेसर राहतील, ही आशा व्यक्त केली. तसेच तिन्ही विभागाच्या शिक्षिकांसोबत संवाद साधला. कु. भक्ती पिसे आणि कु. नेहा घुडे या विद्यार्थिनींनी 'वंदे मातरम्' गीत सादर केले. काही विद्यार्थिनींना डॉ. विजय भटकर सर यांच्याविषयी तयार केलेली दैनंदिनी त्यांनी भेट स्वरूपात दिली. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी, आ. प्रज्ञाताई डोणगावकर, रत्नप्रभा मेहता बालविकास मंदिरच्या संचालिका आ. उल्काताई रुईवाले, शाळेच्या मुख्याध्यापिका मनिषाताई रायबागकर, सरांच्या समवेत आलेली मान्यवर मंडळी, सर्व शिक्षिका आणि विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री गहाणकरी यांनी केले.



कारंजा, कंकुबाई माध्यमिक कन्या शाळेत ज्येष्ठ शास्त्रज्ञ श्री. विजय भटकर यांच्या सबोत शिक्षिका, मुली व पदाधिकारी

## महाराष्ट्र जैन साहित्य परिषद संमेलन याच्या अध्यक्षपदी श्री. विजय आवटी यांची निवड



दि. २५ व २६ डिसेंबर २०२५ रोजी फलटण येथे होणाऱ्या महाराष्ट्र जैन साहित्य परिषद संमेलनाच्या अध्यक्षपदी श्री. विजय दादा आवटी, जयसिंगपूर यांचे सर्वानुमते निवड झाली आहे. यासंबंधीचे पत्र संस्थापक पदसिद्ध अध्यक्ष परमपूज्य जगद्गुरु स्वस्तिश्री लक्ष्मीसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामीजी कोल्हापूर यांच्याकडून प्रदान करण्यात आले. ते आपल्या सन्मती मासिकाचे भूतपूर्व संपादक असून सार्वधर्म, प्रगती आणि जिनविजय या मासिकांचेही संपादक होते. आज अखेर त्यांनी ३१०५ सुश्राव्य व्याख्याने दिली आहेत. वक्तृत्व साधना, आनंदाने जगावे कसे? इत्यादी २२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. व्याख्यान केसरी, आदर्श शिक्षक राष्ट्रपती पुरस्कार अशी विविध स्तरावरील २७ पुरस्कार प्रदान करण्यात आले आहेत. सन्मती परिवारातर्फे त्यांना हार्दिक शुभेच्छा...


पश्चिम महाराष्ट्रातील जैन सत्साहित्य मिळण्याचे एकमेव ठिकाण......

**भरतेश ग्रंथ भांडार**

मु. पो. बाहुबली, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर ४१६ ११०
**संपर्क :** श्री बाबगोंडा पाटील
८७६७५४१७१०


## मागील अंकाविषयी अभिप्राय.....

अत्यंत आकर्षक मुखपृष्ठ घेऊन सन्मतिचा दीपावली विशेषांक नजरेसमोर आला...सौधर्म इंद्राचं आनंद नृत्य रंगांमध्ये बांधणारे चित्रकार खरोखर धन्य होत.

एक दिवा मनाच्या दारात ज्ञानदीप स्व अंतरात... हे सांगत खरोखर उजाळा घेऊन आला 'सन्मति'. वंदनाताई आपली कविता शांत स्निग्ध तेवणारी ज्योत जणू. जरूर वाचावी ही कविता.

डॉक्टर नेमिनाथ शास्त्री यांचा 'दीपावली अशी साजरी करा' हा अत्यंत महत्त्वपूर्ण लेख आहे.

आपल्या साहित्य मंचावरील प्रिया डाखोडे यांचा आठवणींची पोतडी उघडणारा...थोडा वेगळा लेख वाचनीय आहे. श्री प्रवचनसार तर भगवंतांच्या वाणीचा सार. संसारात राहणाऱ्या या आत्मदेवाला स्वतःची ओळख करून देणारा 'श्री योगसार' प्रियदर्शनजींच्या चिंतनातून आपल्यापर्यंत पोहोचतो. जरूर ग्रहण करावा.

आजचा काळ आपल्याला धार्मिकदृष्ट्या किती अनुकूल आहे हे लक्षात येतं जेव्हा एक राजकीय परिवार धार्मिक दृष्ट्या कुठल्या कुठल्या स्थित्यंतरातून जातो.. हे आपण इतिहासातून बघतो.. दाखवणारा लेख आहे आपल्याच साहित्य मंचावरील विपुलताई खेडकर यांचा.. 'पट्टमहादेवी'. जरूर वाचावा.

सन्मतिच्या संपादिका आ. प्रज्ञाताई डोणगावकर यांनी त्यांच्या लेखात आपल्या जैन कलावैभवाचे दर्शन घडवले आहे. खरोखर अभिमानास्पद आहे हा वारसा आम्हाला लाभलेला. हा लेख आपण जरूर मंचावर पाठवावा. आ. प्रज्ञाताई आपले मनःपूर्वक अभिनंदन. सन्मतिचा दीपावली अंक सर्वांग नटलेला आहे. विचारांना चालना देणारा आहे. हा अंक सुंदर बनवण्यासाठी ज्यांचे ज्यांचे हात लागलेत सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

## प. पू. गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांची १३४वी जयंती सर्वत्र संपन्न

**✻ कारंजा –**

कंकुबाई कन्या शाळेत दि. १९ डिसेंबर रोजी श्राविकाश्रम संस्थेचे संस्थापक, गुरुकुल शिक्षण प्रणालीचे प्रवर्तक, अध्यात्मयोगी, मुनिधर्मसाधक, विचारवंत, प्रसिद्धी पराङ्मुख, सन्मार्गप्रेरक, जिनधर्मप्रोत्साहक, समाज हितचिंतक अशा बहुगुणांनी समृद्ध असलेले परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांचा जयंती समारोह साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रज्ञाताई डोणगावकर, संस्थेचे अध्यक्ष कीर्तीकुमारजी भोरे, उल्काताई रूईवाले, मुख्याध्यापिका मनिषाताई रायबागकर उपस्थित होत्या. कार्यक्रमामध्ये रत्नप्रभा मेहता बालक मंदिरच्या विद्यार्थ्यांनी बलोपासना कवायत सादर केली. तर प्राथमिक विभागातील विद्यार्थिनींनी 'मेरा मन समर्थ हो' या प्रार्थनेवर नृत्य सादर केले. तसेच माध्यमिक विभागातील विद्यार्थिनींनी संवादामधून गुरुदेवांच्या जीवनावर प्रकाश टाकला. शाळेच्या पर्यवेक्षिका कल्पना घोंगटे यांनी महाराजांचे अहिंसा विषयक विचार, दाखले देऊन स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रज्ञाताईंनी आपल्या भाषणात महाराजांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सुस्पष्टता व ध्येय आयुष्यात आवश्यक आहे हे सांगताना, कार्याकडे सकारात्मकपणे बघितल्यास जास्त आनंद व समाधान मिळते हे सांगितले. मा. कीर्तीभाऊ भोरे यांनी नियमितपणाचे महत्त्व सांगत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

संस्थेचे सचिव श्री. संजीव रूईवाले, आ. प्रांजलीताई रूईवाले आणि मान्यवर मंडळी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा मुंडवाईक आणि स्नेहा गहाणकरी यांनी केले.

**✻ बाहुबली–**

बाहुबली येथे प. पू. गुरुदेव समंतभद्र महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न झाली. यावेळी सकाळी गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या प्रतिमेची ऐरावत हत्तीवरून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर गुरुदेव समंतभद्र महाराजांच्या समाधीस्थळी चरणाभिषेक तसेच गुरुदेवश्री समंतभद्र पूजन करण्यात आले.

आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज, मुनी १०८ श्री सुयोगसागरजी महाराज, मुनी १०८ श्री सहिष्णुसागरजी महाराज, आर्यिका १०५ श्री अनुश्रुतमती माताजी, आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री श्री माताजी, आर्यिका १०५ श्री संवित्तिश्री माताजी, आर्यिका १०५ श्री सुदृष्टिश्री माताजी मंगल सानिध्य लाभले होते. यावेळी इष्टोपदेश म्हणजे आत्म–कल्याणासाठी दिलेला श्रेष्ठ व हितकारक उपदेश. इष्टोपदेश हा लघुसमयसार म्हणून ओळखला जातो. या ग्रंथाचे विधान संपन्न झाले. या विधानासाठी संस्थेचे पदाधिकारी, शाखेतील सर्व मुख्याध्यापक, अध्यापक, अध्यापिका, गुरुकुल विद्यार्थी, गुरुकुल स्नातक व परिसरातील श्रावक सहभागी झाले होते.

विधानानंतर आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी यांनी आपल्या आशीर्वाचनामध्ये गुरुकुल परंपरा जिवंत ठेवणे, समंतभद्र महाराजांचे कार्य अखंडितपणे पुढे नेणे, गुरुकुलाचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. दुसऱ्यांकडून मान–सन्मानाची व कोणताही स्वार्थ न ठेवता सेवा भाव ठेवून सदैव कार्य करणे आवश्यक आहे. गुरुकुल हे संपूर्ण विश्वाचे कुटुंब आहे, अशी भावना मनात ठेवून सर्व लोक आपले कसे होतील, गुरुकुलाचा मुख्य हेतू, महाराजांचा विचार कसा माणसात रुजेल यासाठी प्रयत्न करावेत, असे आशीर्वाचन दिले.

यानंतर आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांनी आशीर्वाचनामध्ये गुरुकुलच्या विद्यार्थ्यांसाठी नूतन वसतिगृह बांधण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला, नवीन पिढीने धर्माचे संरक्षण करावे, विद्यार्थ्यांना लौकिक शिक्षणाबरोबर नैतिक शिक्षण सुद्धा द्यावे, असे आशीर्वचन दिले.

या कार्यक्रमासाठी माजी गुरुकुल स्नातक, परिसरातील श्रावक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**❊ श्री. महावीर ब्रह्मचर्याश्रम, कारंजा (लाड) –**
विशेष पूजन व भव्य शोभयात्रा– गुरुदेवांच्या जयंतिनिमित्त आयोजित प्रात:कालीन कार्यक्रमांच्या क्रमामध्ये श्री. जिनेंद्र अभिषेक व पूजन तसेच प्रासंगिक गुरुदेव समंतभद्र पूजन घेण्यात आले. त्यानंतर गुरुदेवांच्या फोटोची पालखीतून लेझिमच्या तालावर सवाद्य शोभायात्रा काढण्यात आली. ज्यामध्ये गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. त्यानंतर गुरुदेवांच्या चरण पादुकेसमोर अर्घ्यार्पण व स्तुती वाचन करण्यात आले. तसेच माजी स्नातकांचा सन्मान समारोह झाला.

विनयांजली सभेचे आयोजन– श्री महावीर ब्रह्मचर्याश्रम हायस्कूल येथे सकाळी परिपाठाच्या वेळी सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या वतीने हारार्पण करून विनयांजली समर्पित करण्यात आली. तसेच शाळेमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने कृतज्ञतापर सभेचे आयोजन करण्यात आले. पूज्य गुरुदेवांच्या जीवनातील निवडक व प्रेरक प्रसंगातून त्यांच्या जीवनावर माहिती दिली तर शिक्षक वक्ता म्हणून कु.श्वेता टिकाईत मॅडम यांनी गुरुदेवांच्या गृहस्थाश्रमीच्या शालेय व महाविद्यालयीन जीवनामध्ये घडलेल्या विविध घडामोडी, कारंजा येथे त्यांचा आगमनाचा हेतू, गुरुकुलची स्थापना इ. संबंधी थोडक्यात माहिती देऊन प. पू. गुरुदेवांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. विनयांजली सभेचे अध्यक्ष आ. मुख्याध्यापक श्री. सरोदे सर यांनी महापुरुषांच्या जीवनासंबंधीची नियोजनबद्धता व कार्यपद्धतीची सजगता व्यक्त करून प. पू. गुरुदेवांप्रती आदरांजली व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सौ. प्रियंका मोहकार मॅडम यांनी केले.

संस्थेच्या वतीने कृतज्ञता पर सभेचे आयोजन– सेंटर फॉर जैनिझममध्ये सायंकालीन सत्रात 'गुरुदेव समंतभद्र जीवन परिचय व कर्तव्य' या विषयावर आधारित सभेचे आयोजन करण्यात आले. सभेचे अध्यक्षीय स्थान संस्थेचे विश्वस्त श्री. कीर्तीकुमार भोरे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. अमलप्रभ चवरे यांची उपस्थिती लाभली. सोबतच नागपूर निवासी माजी स्नातक श्री. आदिकुमार बंड तसेच शिक्षक वक्ता म्हणून श्री. चिंतामण भुस सर यांची मंचावर उपस्थिती लाभली. चि. प्रणव लुंगारे, चि. विराज यावलकर, चि. वेदांत चोपडे व चि. संस्कार वाडेवाले यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवून पूज्य गुरुदेवांच्या बालपणी मातापित्यांचे त्यांच्यावर झालेले संस्कार, प्राथमिक– माध्यमिक– उच्च शिक्षण, त्यांना लाभलेली प्रखर बुद्धिमत्ता, महाविद्यालयीन जीवनात मराठी, इंग्रजी व संस्कृत साहित्याचे वाचन, शालेय जीवनातील त्यांचे मित्र हुतात्मा मोतीचंद इत्यादी संबंधी माहिती आपल्या भाषणातून कथन करून पूज्य गुरुदेवांच्या पावन स्मृतींना जाणून घेण्याचा प्रयत्न केला. सभेचे प्रमुख अतिथी श्री. अमलप्रभ चवरे यांनी त्यांच्या लहानपणी ते परमपूज्य गुरुदेवांना बाहुबली येथे भेटायला गेले असता गुरुदेवांकडून त्यांना मिळालेली अनमोल शिकवण 'कोणतेही ध्येय साध्य करण्यासाठी सर्वप्रथम उद्दिष्टांची स्पष्टता, ते उद्दिष्ट ट्रॅक करण्या योग्य आहे काय? ते कसे करता येईल? आणि कधीपर्यंत करता येईल? हे स्पष्ट असेल तर ध्येय साध्य होण्याची शक्यता वाढते' हे विद्यार्थ्यांना सांगून परम पूज्य गुरुदेवांच्या अनमोल विचारांविषयी मार्गदर्शन केले. श्री. आदिकुमार बंड यांनी गुरुदेवांविषयीच्या आठवणी सांगून स्व–काव्यरचनेतून परम पूज्य गुरुदेवांप्रती कृतज्ञता पर भाव व्यक्त केले. सभेचे शिक्षक वक्ता श्री. भूस सर यांनी परमपूज्य गुरुदेवांच्या प्रेरणादायी आदर्श व्यक्तिमत्त्वाबद्दल कथन करून त्यातील थोड्या देखील सवयींचा अंगीकार केल्यास जीवनाचे कल्याण होते. यासंबंधी सभेला मार्गदर्शन केले. कृतज्ञतापर सभेचे अध्यक्ष श्री. कीर्तीकुमार भोरे यांनी महापुरुषांच्या जीवनासंबंधीची नियोजनबद्धता व कार्यपद्धतीची सजगता व्यक्त करून प. पू. गुरुदेवांप्रती आदरांजली व्यक्त केली.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका कु. श्वेता टिकाईत मॅडम यांनी केले.

# श्री अतिशय क्षेत्र बाहुबली येथे मुनी १०८ श्री सुविनीतसागर महाराज यांची सल्लेखनापूर्वक समाधी महोत्सव संपन्न.



दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी अतिशय क्षेत्र बाहुबली (कुंभोज) याठिकाणी आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज व आर्यिका १०५ श्री शुद्धोऽहंश्री माताजी आणि संघस्थ त्यागी यांच्या मंगल सान्निध्यामध्ये दि. १७ डिसेंबर रोजी सोलापूर निवासी दानवीर संतोष चंदुलाल शहा यांची क्षुल्लक दीक्षा संपन्न झाली होती.

संतोष शहा हे प्रात:स्मरणीय परमपूज्य गुरुदेव १०८ श्री समंतभद्र महाराज यांच्या गृहस्थाश्रमातील बंधूंचे नातू आहेत. तसेच मुनी १०८ श्री सुप्रभसागरजी महाराज यांच्या गृहस्थाश्रमातील काका होते. ते बऱ्याच काळापासून जैन मुनी व आर्यिका यांची मनोभावे सेवा करीत होते. यांच्या गृहस्थाश्रमातील कन्या आर्यिका १०५ श्री नेत्याश्री माताजी आहेत. परिवारातील ही ५ वी दीक्षा होती. बरेच काळ आजारी असल्याने अंत:समयी मुनी बनून समाधीपूर्वक एखाद्या पवित्र क्षेत्रावर देहत्याग करावे, अशी त्यांची इच्छा होती.

आचार्य १०८ श्री सुयशसागरजी महाराज यांनी जैन विधिपूर्वक यांना क्षुल्लक दीक्षा दिली व त्यांचे 'क्षुल्लक श्री १०५ सुविनीतसागर महाराज' असे दीक्षानंतरचे नामकरण केले होते. दि. १९ डिसेंबर रोजी सकाळी मुनिदीक्षा घेऊन ११ वाजून ३५ मिनिटांनी आत्म-संयमपूर्वक उत्कृष्ट सल्लेखना झाली आहे. दहन क्रिया १ वा. ३० मिनिटांनी बाहुबली येथे संपन्न झाली. या वेळी उपस्थित डॉ. चंदन संतोष शहा, अमित शहा, प्रेरणा शहा, चिरंजीव माणिक शहा, ब्र. मंगल दीदी, ब्र. सुरेखा दीदी ब्र. सीमा दीदी, बाहुबलीचे सर्व पदाधिकारी, माजी गुरुकुल स्नातक, विद्यार्थी, सोलापूर व परिसरातील जैन श्रावक, श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**श्रद्धांजली सभा व रक्षाविसर्जन-**

रविवार दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी त्यांच्याप्रती श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या पूर्वाश्रमीचे संतोष शहा यांच्या पत्नी चंदन शहा यांनी आपल्या मनोगतामध्ये सोलापूरहून बाहुबली पर्यंतचा प्रवास आणि संतोषजी शहा यांची मानसिक व शारीरिक स्थिती कशी होती हे सांगत असताना त्यांनी आचार्य श्री १०८ सुयशसागरजी महाराज व संपूर्ण संघ व बाहुबली संस्थेचे विशेष करून आभार व्यक्त केले. अशा अंतिम समयांमध्ये सुद्धा सर्वांनी सहकार्य व आपलेपणा दाखविला याबद्दल त्यांनी ऋण व्यक्त केले.

परमपूज्य आर्यिका १०५ शुद्धोऽहंश्री माताजी यांनी समाधी मरणाचे महत्त्व सांगून अंतिम समयी सल्लेखनापूर्वक मरण झाले पाहिजे. जैन शास्त्रांमध्ये गृहस्थ जीवनाचे चार आश्रम सांगितले असून, त्यापैकी वयाच्या पन्नाशीपर्यंत वानप्रस्थ स्वीकारावा व अंतिम समयी संन्यास घेऊन आपले नरभव सार्थक करावे, असे आशीर्वचनात सांगितले.

परमपूज्य आचार्य १०८ सुयशसागरजी महाराज यांनी परमपूज्य सुविनीतसागरजी महाराज यांच्या अंतरीक भावनांचा उल्लेख करत सांगितले की, त्यांनी खऱ्या अर्थाने आपले मनुष्यभव सार्थक केले आहे. सर्व श्रावकांनी आपल्या जीवनात समाधीपूर्वक मरण प्राप्त करण्याचा आदर्श ठेवावा, कारण मृत्यू सर्वांनाच येतो, मात्र समाधीमरण हे महोत्सवासारखे मंगलमय असते, असे त्यांनी प्रतिपादन केले. या पवित्र कार्यासाठी विशेष सहकार्य लाभल्याबद्दल महाराजांनी संस्थेचे मनःपूर्वक आभार मानले. यावेळी सल्लेखनापूर्वक समाधीमरणाचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व उपस्थितांना समजावून सांगण्यात आले.

याप्रसंगी एस. एस. पाटील, डॉ. अशोक नाईक, डॉ. महावीर अक्कोळे यांनी आपल्या मनोगतातून विनियांजली अर्पण केली. डॉ. नेमिनाथ बाळीकाई यांनी साभासंचालन केले. याप्रसंगी संस्थेचे संचालक गोमटेश बेडगे, तात्यासो अथणे, अनिल हिंगलजे, तसेच सोलापूर व बारामतीहून आलेले अनेक श्रावक, श्राविका व गुरुकुलचे विद्यार्थी उपस्थित होते.

## कार्तिक पौर्णिमा... वार्षिकोत्सव...




डॉ. आशुतोष चोपडे, सांगली



मान्यवरांच्या शुभ हस्ते बाहुबली दिनदर्शिका २०२६
याचे प्रकाशन होत असता..

(वार्ता पृष्ठ क्र. ३५वर)



श्री. दीपक पाटील यांचा सन्मान

## अध्यापक मार्गदर्शन कार्यशाळा...

(वार्ता पृष्ठ क्र. ३६वर)



डॉ. विकास सलगर, सांगली



ॲड. श्री. श्रीकांत माळकर



श्री. गणेश माने, रूई

बाहुबलीच्या शाळेत ताई माझी लाडकी या उपक्रमअंतर्गत आदित्य युथ फाऊंडेशन व रोटरी क्लब यांच्या सहकार्याने आरोग्यविषयक कार्यक्रम प्रसंगी मा. आमदार श्री. अशोकराव माने (बापू) यांचा सन्मान करताना मुख्याध्यापक श्री. गोमटेश बेडगे, श्री. आदित्य पाटील, सौ. पद्मावती काकी, सौ. सुरेखा वहिनी व इतर मान्यवर.....

(वार्ता पृष्ठ क्र. ३७वर)







कोल्हापूर जिल्हा भारतीय जैन संघटना, पश्चिम महाराष्ट्र अंतर्गत कुंभोजचे सुपुत्र जेष्ठ व माजी जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक श्री. बाबासाहेब पाटील (अण्णा) अध्यक्ष, श्री बाहुबली क्षेत्र दिगंबर जैन एण्डौन्मेंट ट्रस्ट, बाहुबली विद्यापीठाचे कोषाध्यक्ष यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व सहकार क्षेत्रात कार्यरत राहून वेगवेगळ्या कामाद्वारे समाजोपयोगी अनेक कामे केल्याबदल केलेल्या कार्यांचा आढावा घेऊन भारतीय जैन समाज संघटनेच्या वतीने समाजरत्न कृतज्ञता हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी त्यांचा सन्मान करताना उपस्थित मान्यवर...

RNI No. MAH/MAR/2006/21290/27-9-07 Reg. No. KLR-022/2024-2026 Posted at Bahubali on- 31-12-2025






बाहुबली येथील प्रशालेचे क्रीडा-अध्यापक श्री. उदय पाटील यांची शिक्षक-अधिकारी या गटात विभागीय स्तरावरून राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेकरिता निवड झाली आहे. याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन..!!



बाहुबली येथील प्रशालेचा विद्यार्थी संस्कार गणेश सपकाळ, कुंभोज याची लखनौ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील लांब उडी या खेळात निवड झाली. या नॅशनल लेवलसाठी त्यांने अनेक वर्षापासून मेहनत घेतली आहे. क्रीडाध्यापक श्री. शरद जुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन..!!

बाहुबली विद्यापीठाचे पार्श्वमती विद्यालय, अकोळ या शाळेची कु. संचिता सचिन जबडे हिने लंगडी या खेळात राष्ट्रीय स्तरावर सिल्वर मेडल मिळविले. तिचे हार्दिक अभिनंदन.!!






बाहुबली येथील एम. जी. शहा विद्यामंदिर व जुनि. कॉलेज या प्रशालेची माजी विद्यार्थिनी कु. समृद्धी दीपक भोईटे, नेज हिची नुकतीच भारतीय नौदल सेनेत सब लेफ्टनंट पदी नियुक्ती झाली. तिने या प्रशालेतून इ. ५वी ते १०वी पर्यंतचे शिक्षण घेतले आहे. प्रशालेतील सन्मानप्रसंगी तिने आपली भावना अशी व्यक्त केली की, या शाळेतील संस्कृत सुभाषित पाठांतर, इंग्रजी शब्द पाठांतर, वक्तृत्व, निबंध, चित्रकला, रांगोळी, हस्तकला, क्रीडा अशा बौद्धिक व शारीरिक स्पर्धेत सहभागी होत असे. येथील अध्यापकांनी अत्यंत तन्मयतेने व आपलेपणाने शिकविले. वेळोवेळी मार्गदर्शन केले. वाचन, लेखन व पाठांतर यासोबत शारीरिक कौशल्य आत्मसात करण्यासाठी खूप प्रयत्न केले. येथील निसर्गरम्य वातावरण आणि त्यासोबत असलेल्या भारतीय संस्कृतीस पोषक अहिंसा, जीवदया, परस्पर मैत्री व विश्वबंधुत्वाची भावना जोपासण्याचे मिळणारे मूल्यशिक्षण यातूनच माझे जीवन घडले व देशसेवेची भावना मिळाली. आपण देखील या बालपणी आपल्या जीवनाचा पाया भक्कम करावा. मी सातत्याने विचार करीत असे की या शाळेच्या मंचावरून येणाऱ्या पुढच्या पिढीला संबोधित करेन आणि ते सद्भाग्य मला लाभले आहे. याकरिता मी शाळेच्या सर्व शिक्षक-शिक्षकांना मनापासून धन्यवाद देते आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करते.

www.sanmatimasik.com

प्रेषक,
सन्मति प्रकाशन
पो. बाहुबली,
जि. कोल्हापूर-४१६ ११०
फोन : ९० ४९ ४७ ३४ ३४
E-mail : sanmatimasik@gmail.com

प्रति,

प्रकाशक : श्री. गोमटेश बेडगे, मालक : श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रम, बाहुबली
मुद्रण स्थळ : शिव इम्प्रेशन्स्, कोल्हापूर. प्रकाशन स्थळ : बाहुबली